cmyk

## संपादकीय

### मोदींचे अज्ञान राष्ट्रीय दुर्दैव !

'गांधी' हा चित्रपट येईपर्यंत महात्मा गांधींना जगात फारसे कोणी ओळखत नव्हते, अशा आशयाचे अज्ञानमूलक व हास्यास्पद विधान दोन दिवसांपूर्वी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. त्यानंतर ते देश-विदेशात प्रचंड मोठ्या टीकेचा आणि उपहासाचा विषय बनले. एका खासगी वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत पंतप्रधानांनी हे वादग्रस्त विधान केले आहे. चित्रपटामुळे महात्मा गांधी जगाला माहीत झाले हे पंतप्रधान मोदींचे वक्तव्य वास्तववादी नाहीच उलट ते बेजबाबदार आणि अतार्किक आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-५२ | रविवार दि.२ जून २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये


## आज होणार विठुरायाचे चरणस्पर्श

पंढरपुर : तब्बल ७९ दिवसांनी पुन्हा एकदा विठुरायाचे चरणस्पर्श घेता येणार आहे. रविवार, दि. २ जूनला पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पूजा करण्यात येणार असून त्यानंतर भाविकांसाठी विठुरायाचे चरणस्पर्श सुरु होणार आहे. विठुरायाच्या मंदिराला ७०० वर्षापूर्वीचे रूप देण्याचे काम १५ मार्च पासून सुरु होते. गेले दीड महिना अहोरात्र मेहनत घेऊन कारागिरांनी साडेतीन फूट लांब आणि साडेतीन फूट रुंद अशा आकाराची मेघडंबरी उभारली आहे.

# खासगी संघाकडून दुधाच्या दरात कपात

## दूध उत्पादक संघटना आक्रमक

**पुणे । प्रतिनिधी**

**उन्हाळ्यात दूध उत्पादनात घट आणि वाढत्या मागणीमुळे दर वाढण्याची अपेक्षा असतानाच खाासगी दूध संघांनी एक रुपया प्रति लीटर दरात कपात केल्याने राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. आधीच दुष्काळ आणि चारा-पाण्याच्या टंचाईमुळे त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांवर ही दुधाच्या किमतीत कपात म्हणजे दुष्काळात तेरावा महिना.**

यंदाच्या दुष्काळामुळे चारा आणि पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे दूध उत्पादनात घट झाली आहे. याबरोबर, पान २ वर

### मनमानी कारभारावर तीव्र टीका

दूध उत्पादक शेतकरी संघर्ष समितीचे राज्य समन्वयक डॉ. अजित नवले यांनी खासगी दूध संघांच्या मनमानी कारभारावर तीव्र टीका केली आहे. त्यांनी तात्काळ दरात वाढ करण्याची आणि ५ रुपये प्रति लीटर अनुदानात अडथळे दूर करण्याची मागणी केली आहे. अन्यथा रस्त्यावर उतरण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

### सरकारकडून त्वरित हस्तक्षेप आवश्यक

दुष्काळ आणि वाढत्या खर्चामुळे आधीच अडचणीत असलेल्या दूध उत्पादक शेतकर्यांना दरातील कपामुळे मोठा फटका बसला आहे. या गंभीर परिस्थितीत राज्य सरकारने त्वरित हस्तक्षेप करून शेतकर्यांना मदत करणे गरजेचे आहे. दूध उत्पादनाचा व्यवसाय टिकून राहण्यासाठी आणि शेतकर्यांना योग्य भाव मिळण्यासाठी सरकारने ठोस पावले उचलणे आवश्यक आहे.

# शेतकरी संकटात, कृषी मंत्री परदेशात

## विजय वडेट्टीवार यांची कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर टीका

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील शेतकरी दुष्काळात होरपळत असताना सरकार आणि प्रशासन मात्र स्वतःच्या वेगळ्या दुनियेत व्यस्त आहे. असे असताना राज्यातील शेतकरी संकटात मरतोय तर राज्याचे कृषी मंत्री परदेशात फिरताहेत अशी टीका विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकऱ्यांना कोणतीही मदत सरकारकडून अजून मिळालेली नाही. त्यामुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना पान २ वर

# देशात पुन्हा एनडीए सरकार ?

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**देशभरातील मतदानाचे टप्पे शनिवारी पुर्ण झाले आहेत. ४ जूनला निवडणुकीचा निकाल समोर येणार असून, त्याआधी एक्झिट पोल समोर आले आहेत. त्यामध्ये एनडीएला स्पष्ट बहुमत मिळणार असल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.**

## सर्वच एक्झिट पोलकडून अंदाज

निकालाआधी देशाच्या जनतेचा कौल कुणाच्या बाजूने आहे, याचा एक्झिट पोल समोर आला आहे. या निवडणुकीतही भाजप सत्ता राखण्यात यशस्वी ठरल्यााचे एक्झिट पोलमध्ये दिसत आहे. एबीपी सी वोटरच्या एक्झिट पोलनुसार, कर्नाटकसह दक्षिणेतील इतर राज्यांमध्ये भाजपने मुसंडी मारल्याचे दिसत आहे. तेलंगणा, आंध्र प्रदेशमध्येही भाजपला मोठे यश मिळाल्याचा एक्झिट पोलचा अंदाज आहे. मात्र, महाराष्ट्रात भाजपच्या नेतृत्वात महायुतीला फटका बसल्याचा अंदाज आहे. एक्झिट पोलमध्ये महाराष्ट्रात महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये काटे की टक्कर पाहायला मिळत आहे. केरळ आणि तामिळनाडूमध्ये भाजप खाते उघडण्याची शक्यता आहे. एक्झिट पोलमध्ये केरळमध्ये एनडीएला १ ते ३ जागा मिळण्याचा अंदाज आहे, तर यूडीएफला १७ ते १९ जागा, तर एलडीएफला आणि इतरांना शून्य जागा मिळण्याची शक्यता आहे. मध्य प्रदेशात इंडिया आघाडीला १ ते ३ जागा मिळण्याचा तर एनडीएला २६ ते २८ जागा मिळण्याचा अंदाज आहे. एक्झिट पोलमध्ये तेलंगणामध्ये एनडीएला ७ ते ९ जागा, इंडिया आघाडीला ७ ते ९ जागा आणि इतरांना ० ते १ जागा मिळत आहेत. टक्केवारीमध्ये एनडीएला ३३ टक्के, पान २ वर

### आघाडीचा ३०० पारचा दावा

निवडणुकीचे रणशिंग फुंकताना भाजपला सलग तिसऱ्यांदा सत्ता राखण्याचा विश्वास असून एनडीएने ४०० पार चा नारा दिला. तर सत्ताधाऱ्यांविरोधात सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येत इंडिया आघाडी स्थापन केली. इंडिया आघाडीने भाजपचा विजयरथ रोखण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत ३०० हून अधिक जागा जिंकण्याचा दावा केला आहे.

### हा तर सरकारी एक्झिट पोल- काँग्रेस

निवडणुकीसंदर्भातील आलेल्या एक्झिट पोलवर प्रतिक्रिया देताना काँग्रेसने हे योग्य नसल्याचे म्हटले आहे. पक्षाच्या नेत्या सुप्रिया श्रीनेत म्हणाल्या की, हे एक्झिट पोल जनतेचे नसून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आहेत. सुप्रिया श्रीनेत यांनी म्हटले की, ''सरकारी एक्झिट पोल आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एक्झिट पोल आहे. जनतेच्या एक्झिट पोलनुसार विरोधी इंडिया आघाडीला २९५ जागा मिळत आहेत. यातली एकही जागा कमी होणार नाही. आम्हाला याचा अंदाज आहे.

# महाराष्ट्रात भाजपला धक्का; ठाकरे, पवारांचा रथ सुसाट

## एक्झीट पोलनुसार मोदी लाटेची जनतेनेच खोलली पोल; महायुती २२, आघाडीला २५ जागा मिळणार

### मविआ आणि महायुतीमध्ये रस्सीखेच

एबीपी माझा-सी वोटरच्या एक्झिट पोलमध्ये महाराष्ट्रात दिसली रस्सीखेच. महायुती व मविआला निम्म्या निम्म्या जागांचा अंदाज. महायुतीला २४ तर मविआला २३ जागांचा अंदाज. भाजप १७, तर शिंदे गटाला ६ जागांचा अंदाज. अजित पवार गटाला फक्त एक जागेवर विजय शक्य. मविआमध्ये काँग्रेसला ८, ठाकरे गटाला ९ जागांचा अंदाज. शरद पवार गटाला ६ जागा मिळण्याचा अंदाज.महाराष्ट्रात महायुतीसह भाजपला मोठा तोटा शक्य. २०१९ ला २३ जागा जिंकणाऱ्या भाजपला यावेळी १७ जागांवरच विजय मिळण्याची शक्यता. शिंदे गटाचा आकडाही १३ वरुन ६ पर्यंत घसरण्याची शक्यता.

### महाराष्ट्रात कोणाला किती जागा मिळणार?

मविआ- २२ ते २५, महायुती - २३ ते २६ गेल्या लोकसभा निवडणुकीत शिवसेना-भाजप युतीला महाराष्ट्रात ४१ जागांवर विजय मिळाला होता. मात्र, आता आकडा २६ जागांपर्यंत खाली आल्यास हा भाजपप्रणित आघाडीसाठी मोठा धक्का ठरेल. या २६ जागांमध्ये भाजपचे किती उमेदवार असणार, हे पाहावे लागेल. यापैकी बहुतांश उमेदवार भाजपचे असल्यास शिंदे गट आणि अजित पवार गटामुळे फारसा फायदा झाला नसल्याचे स्पष्ट होईल.

### महाराष्ट्रात कोणत्या पक्षांनी किती जागा लढल्या?

**» महायुती**

- भाजप - २८
- एकनाथ शिंदे - १५
- अजित पवार - ४
- महादेव जानकर - १

**» महाविकास आघाडी**

- उद्धव ठाकरे गट - २१
- काँग्रेस - १७
- शरद पवार - १०

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस फोडून त्यांचे आमदार, खासदार सोबत घेतल्याने महायुती सक्षम होईल, हे भाजपच्या नेत्यांना वाटले होते. मात्र विविध एक्झिट पोलनुसार मोदी लाटेसह देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची जनतेनेच पोल खोलली असल्याचे चित्र आहे. राज्यात महायुतीला धक्का बसणार असून महाविकास आघाडीचा रथ सुसाट असल्याचे पोलच्या माध्यमातून दिसत आहे. महाविकास आघाडीला २३ ते २६ जागा तर महायुतीला २२ ते २४ जागा मिळण्याची शक्यता आहे.

राज्यात फोडाफोडी केल्यावर महायुती बळकट होईल, त्याचा फायदा लोकसभा निवडणुकीत होईल, असा अंदाज भाजप नेत्यांचा होता. मात्र या निवडणुकीत झाले पुर्णतः उलटे. त्याच जरांगे फॅक्टरचा राज्यात भाजप महायुतीला मोठा फटका बसला असल्याचे चित्र आहे. पान २ वर

### नगरमध्ये निलेश लंके आघाडीवर

नगर मतदारसंघात झालेल्या अटीतटीच्या लढतीत शरद पवार गटाचे निलेश लंके हे विजयी होतील, असे एक्झीट पोलनुसार दिसते.

### देशात भाजपला मागच्या वेळेपेक्षा जास्त जागा मिळतील- प्रशांत किशोर

नवी दिल्लीः भाजप पुन्हा सत्तेत येईल. त्यांना २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत जितक्या जागा मिळाल्या होत्या तितक्याच जागा किंवा त्यापेक्षा काही जास्त जागा मिळतील, असे भाकीत सुप्रसिद्ध निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी केले आहे. भारताच्या पश्चिम आणि उत्तरेकडील भागात भाजपला मोठे नुकसान होणार नाही. दुसरीकडे देशाच्या पूर्व आणि दक्षिण भागात भाजपच्या जागा आणि मतांची टक्केवारी वाढू शकते. गेल्या काही वर्षांत भाजपने केरळ आणि तामिळनाडूमध्ये आपले मताधिक्य वाढवण्यासाठी कंबर कसली आहे. त्याचा सकारात्मक परिणाम निकालात पहायला मिळू शकतो, असे मत किशोर यांनी मांडले आहे. मे महिन्यातही प्रशांत किशोर यांनी अशीच टिप्पणी केली होती आणि भाजप सरकार गेल्या वेळी जितक्या जागा मिळाल्या होत्या तितक्याच किंवा त्याहून अधिक जागा घेऊन सत्तेत परत येईल असे म्हटले होते.

### अरविंद केजरीवाल यांना दिलासा नाहीच

नवी दिल्ली-दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना कोर्टाकडून दिलासा मिळालेला नाही. कोर्टाने अरविंद केजरीवाल यांच्या अंतरिम जामीनावर निर्णय दिलेला नाही. याचिकेवर ५ जूनला निर्णय सुनावला जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर अरविंद केजरीवाल यांना २ जूनला पान २ वर

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०१ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| **गहू : १८.०० क्विंटल** | | |
| २,२०० | २,७३० | २,४६३ |
| **ज्वारी/हायब्रिड :७४.५० क्विंटल** | | |
| १,७५० | ३,९५० | २,५५३ |
| **मूग : १.५० क्विंटल** | | |
| ५,००१ | ७,१०० | ६,०५० |
| **तूर : १३.५० क्विंटल** | | |
| १०,४५० | ११,९८१ | ११,३२९ |
| **उडीद : ०.५० क्विंटल** | | |
| ४,००० | ४,००० | ४,००० |
| **बाजरी: ४३.०० क्विंटल** | | |
| २,२०० | २,८४५ | २,५३५ |
| **चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल** | | |
| १,७०० | ६,३०० | ४,००० |
| **सोयाबीन:३६.५० क्विंटल** | | |
| ४,४७५ | ४,५०० | ४,४८७ |
| **हरभरा: ९.०० क्विंटल** | | |
| ६,३०० | ६,५०१ | ६,४१४ |

# एम फॅक्टरला माधवं जड; पंकजा मुंडे याच विजयी होणार

## एक्झीट पोलचा कल; गेवराईकडे बजरंग सोनवणे समर्थकांचे लक्ष





**बीड । प्रतिनिधी**

**कोण निवडून येणार हीच आता सर्वत्र चर्चा आहे. जातीय समीकरणाला या निवडणुकीत फार महत्त्व आले. परळी आणि आष्टी विधानसभेची भूमिका पंकजा मुंडे यांच्यासाठी फायद्याची तर बीड, गेवराई हे दोन विधानसभा मतदार संघ बजरंग सोनवणे यांच्यासाठी कौल देणारे ठरतील असा अंदाज आहे. या निवडणुकीत पंकजा मुंडे यांच्याविरोधात श्री एम फॅक्टर सक्रीय झाल्याने बजरंग सोनवणे हे मुख्य लढतीत आले. तरीही एम फॅक्टरला माधवं जड गेले असण्याची शक्यता असून पंकजा मुंडे याच विजयी होतील, असे एक्झीट पोलनुसार दिसत आहे. यात फक्त मताधिक्याचीच सध्या चर्चा आहे.**

ही निवडणूक जरांगे फॅक्टर मुळे पंकजा मुंडे यांना बऱ्यापैकी जड गेली. बजरंग सोनवणे आणि पंकजा मुंडे असा सामना जरी झाला असला तरी खऱ्या अर्थाने पंकजा मुंडे विरुद्ध अप्रत्यक्षरीत्या मनोज जरांगे पाटील असाच सामना रंगला. लोकसभेच्या निवडणुकीमध्ये नाही म्हटले तरी २००९ पासून जातीय रंग येत आहे. मराठा आणि त्यानंतर वंजारी समाजाची सर्वाधिक मतदारसंख्या या मतदारसंघात आहे. त्यामुळे कोणतीही निवडणूक असली तरी मराठा विरुद्ध वंजारी असा निवडणुकीपुरता तरी सामना पाहायला मिळतो. यावेळी मराठा आरक्षण आंदोलनामुळे बराच मराठा समाज भाजपच्या विरोधात गेला होता. त्यात मनोज जरांगे पाटील यांनी बीडवर बऱ्यापैकी लक्ष केंद्रीत केल्याने त्यांना मानणारा वर्ग पंकजा मुंडे यांच्या विरोधात उभा राहीला. शिवाय देशस्तरावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात मुस्लिम समाजाने उतरण्याचे ठरवल्याने त्याचा बीड पान २ वर

### पंकजा मुंडे-बजरंग सोनवणे असा होईल सामना

एकंदरीत सहा विधानसभा मतदारसंघातील पंकजा मुंडे यांना सात लाख २७ हजार ५५२, बजरंग सोनवणे यांना सहा लाख ८२ हजार १७४ मतदान मिळण्याचा अंदाज आहे. त्यामुळे पंकजा मुंडे यांचा ४५ हजार ३७८ मतांनी विजयी होण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. या निवडणुकीमध्ये वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी ७२ हजार ६४० तर इतर अपक्षांना ३७ हजार २५७ मते मिळण्याचा अंदाज आहे. मुस्लिम समाजातील १८ उमेदवार आहेत जर मुस्लिम समाजाने या उमेदवारांना दोन किंवा तीन हजार मतदान केले तर बजरंग सोनवणे यांच्या पारड्यातील मते कमी होऊन पंकजा मुंडे यांची आघाडी वाढू शकते असा अंदाज आहे.

### माजलगाव बजरंग सोनवणेंना आघाडी देणार

माजलगाव विधानसभा मतदारसंघात मराठा समाज ८२४९०, वंजारी ६३ हजार ४७०, ओबीसी ४१०००, मुस्लिम २३५३०, ब्राह्मण मारवाडी ५ हजार, आणि मागासवर्गीय २७००० मतदान झाल्याचा अंदाज असून या मतदारसंघात बजरंग सोनवणे यांना ७११७ मतांची आघाडी मिळण्याचा अंदाज आहे. या मतदारसंघात ओबीसी आणि मागासवर्गीय समाजाच्या मतांमध्ये सोनवणे यांना टक्का वाढला तर त्यांचे मताधिक्य १५ ते २० हजारापर्यंत जाऊ शकते असाही अंदाज आहे.

### केजमध्ये समतुल्य लढत

केज विधानसभा मतदारसंघांमध्ये मराठा ७२ हजार ८००, वंजारी ८० हजार ५००, मुस्लिम ३५, हजार ८००, ओबीसी २९, हजार ४००, ब्राह्मण आणि मारवाडी १४, ४०० आणि मागासवर्गीय ३५८०० मतदान झाल्याचा अंदाज आहे. या मतदार संघात वंजारी समाजासह ओबीसी समाजाची संख्या मोठी आहे. त्यामुळे येथे समतुल्य लढत झाली असून मताधिक्य हे ५ ते १० हजाराचे कोणालाही राहू शकते.

### बीडमध्ये सोनवणेंना ४० हजारापर्यंत आघाडी?

बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये मराठा ८२५००, वंजारी २५ हजार २००, मुस्लिम ५३ हजार ७००, ०० ब्राह्मण आणि मारवाडी बारा हजार, मागासवर्गीय २७, ४००, ओबीसी ४१ हजार २७७ असे अंदाजित मतदान झाले आहे. वंजारी समाज या मतदार संघात कमी असल्यामुळे बजरंग सोनवणे यांना ३० ते ४० हजारापर्यंत आघाडी या मतदार संघात मिळू शकते, असा अंदाज आहे.

### गेवराईत नेमकं काय होणार?

मराठा समाज एक लाख २२००, वंजारी समाज पंचवीस हजार एकशे तीस, ओबीसी ७८ हजार ९६१, मुस्लिम समाज २५०००, ब्राह्मण मारवाडी ४८००, मागासवर्गीय समाज २४५०० असून या मतदारसंघात वंजारी समाजाची मतदार संख्या कमी आहे तर मराठा आणि इतर ओबीसी संख्या जास्त आहे. पंकजा मुंडे यांना अंदाजित एक लाख पाच हजार त्रेचाळीस तर बजरंग सोनवणे यांना एक लाख ३७ हजार १७६ मते मिळू शकतात. त्यामुळे बजरंग सोनवणे यांना ३२ हजार १३३ मतांची लीड मिळण्याचा अंदाज आहे. जर पंकजा मुंडे यांना मराठा समाजाचे दहा टक्के मतदान झाले तर ही लीड कमी होऊन २७ हजार २३ मतांवर येऊ शकते.

### आष्टीत धसांचा धसका चालणार

आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये मराठा समाज एक लाख चार हजार, वंजारी समाज ८० हजार, ओबीसी ५१९२८, मुस्लिम २१, ५२०, ब्राह्मण मारवाडी ५३०० आणि मागासवर्गीय समाजातील १७ हजार मतदारांनी मतदान केल्याचा अंदाज आहे. या मतदारसंघात, सुरेश धस, बाळासाहेब आजबे आणि भीमराव धोंडे या तिघांनी ताकद लावली असून परळी नंतर भाजपचा हा दुसरा बालेकिल्ला आहे. त्यामुळे या मतदारसंघांमध्ये पंकजा मुंडे यांना एक लाख ४९ हजार ३४०, बजरंग सोनवणे यांना एक लाख पंधरा हजार आठशे ८२ मते मिळणार असल्याचा अंदाज आहे. पंकजा मुंडे यांना ३३४५ ८ मतांची आघाडी मिळण्याचा अंदाज आहे.

### परळीच खरा धमाका करणार

मुंडे बहिण भावांचा बालेकिल्ला असलेल्या परळी मतदारसंघाची निर्णय भूमिका निकालाच्या दृष्टीने राहणार आहे. कारण परळी मध्ये मुंडे बहिण भाऊ वगळता इतर कोणताही नेता आपला प्रभाव अद्याप तरी पाडू शकलेला नाही. या मतदारसंघात मराठा ५८६१०, वंजारी ७५ हजार ९१०, ओबीसी ४१, २३८, मुस्लिम समाज २५ हजार ३००, ब्राह्मण मारवाडी सात हजार १०० आणि मागासवर्गीय समाज २४ हजार ६०० मतदान झाल्याचा अंदाज आहे. मुंडे बहिण भावाचा प्रभाव असलेले या मतदारसंघात मराठा, मुस्लिम, मागासवर्गीय समाजाची ही मोठ्या प्रमाणात पंकजा मुंडे यांना मतदान झाल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे पंकजा मुंडे यांना एक लाख ६१ हजार ५७४, बजरंग सोनवणे ६१ हजार ११६ मते मिळाल्याचा अंदाज असून पंकजा मुंडे यांना या मतदारसंघातून एक लाख ४५८ मतांची विक्रमी आघाडी मिळण्याचा अंदाज आहे.

cmyk

## अग्रलेख

# मोदींचे अज्ञान राष्ट्रीय दुर्दैव !

'गांधी' हा चित्रपट येईपर्यंत महात्मा गांधींना जगात फारसे कोणी ओळखत नव्हते, अशा आशयाचे अज्ञानमूलक व हास्यास्पद विधान दोन दिवसांपूर्वी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. त्यानंतर ते देश-विदेशात प्रचंड मोठ्या टीकेचा आणि उपहासाचा विषय बनले. एका खासगी वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत पंतप्रधानांनी हे वादग्रस्त विधान केले आहे. चित्रपटामुळे महात्मा गांधी जगाला माहीत झाले हे पंतप्रधान मोदींचे वक्तव्य वास्तववादी नाहीच उलट ते बेजबाबदार आणि अतार्किक आहे. सत्तेची लालसा आणि हव्यासापेटी अलीकडे राजकीय नेते अतार्किक विधाने करताना दिसतात. यात पंतप्रधान मोदी आघाडीवर आहेत. खरे तर यंदाची लोकसभा निवडणूक पंतप्रधान मोदींनी अनेक वादग्रस्त विधाने करून गाजवली असेच म्हणावे लागेल. नरेंद्र मोदींना भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महानायकाची अशी बदनामी करण्याचा अधिकार नाही. अशा वक्तव्यातून देशाचा देदीप्यमान इतिहास कलुषित करणे हे त्यांच्या पदाला शोभत नाही.

या आधीच्या पंतप्रधानांनी जपलेला वारसा पुढे नेणे तर सोडाच पण मोदींनी बेताल वक्तव्यांनी पंतप्रधानपदाची प्रतिष्ठाही धुळीला मिळवली आहे. मार्टिन ल्यूथर किंग आणि नेल्सन मंडेला यांनीही वंशवादाविरोधात लढा देताना गांधीजींचा आदर्श समोर ठेवला होता पण आमचे पंतप्रधान म्हणतात, जगाला मार्टिन ल्यूथर किंग आणि नेल्सन मंडेलांबद्दल माहिती असेल तर गांधीजी त्यांच्यापेक्षा कमी नव्हते हे जगाला सांगणे ही देशाची जबाबदारी आहे. हे कसे? गांधीजींचे वैश्विक असणे नेल्सन मंडेला, मार्टिन ल्यूथर किंग, आंग सान स्यू की आणि बराक ओबामा यांसारख्या विदेशी व्यक्तींना आणि जगभरातील विद्यापीठांना माहीत होते हे भारताच्या पंतप्रधानांना माहीत नसावे हे आपले राष्ट्रीय दुर्दैव म्हणावे लागेल. सर रिचर्ड ॲटनबरो यांनी दिग्दर्शित केलेला 'गांधी' चित्रपट १९८२ मध्ये प्रदर्शित झाला. त्यातील टॉलस्टॉय आश्रमाचे चित्रीकरण पुण्याजवळ पनवेलच्या परिसरात झाले होते. त्या वेळी त्यांना भेटायला मराठी चित्रपट दिग्दर्शक राजदत्त गेले होते. त्यांनी ॲटनबरोंना विचारले, जगातल्या सर्व देशांत स्वातंत्र्यासाठी लढलेले महापुरुष झाले. या साऱ्यांना सोडून तुम्ही गांधींवर चित्रपट का काढला? त्यावर ॲटनबरो म्हणाले, देशाच्या स्वातंत्र्यासाठी हाती तलवार घेऊन लढलेले देशभक्त जगातल्या सर्व देशांत झाले पण हाती शस्त्र न घेता देशाचे स्वातंत्र्य मिळविणारा महात्मा फक्त तुमच्या देशात झाला आणि त्याचे नाव गांधी. पंतप्रधान मोदी आणि त्यांच्या अंधभक्तांना हे कोण सांगणार? गांधींचे मोठेपण ॲटनबरोंएवढेच साऱ्या जगाने कधीचेच ओळखले होते. गांधी बॅरिस्टर होऊन १८९३ मध्ये द. आफ्रिकेत गेले. तेथे त्यांनी जी किमया केली, तिनेच हे जग अचंबित झाले होते. भारतात परतल्यानंतर त्यांनी 'सावरकरांची सुटका करा' असा ठराव मुंबई प्रदेश काँग्रेस कमिटीत मंजूर करून घेतला. पुढे तसाच ठराव त्यांनी १९१९ मध्ये काकीनाडा येथे भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनातही मंजूर करून घेतला. याबाबत नरेंद्र मोदी आणि सावरकरभक्त निश्चितच अज्ञानी असतील. रवींद्रनाथ टागोरांनी गांधीजींना 'महात्मा' म्हटले आणि नेताजी सुभाषचंद्रांनी त्यांचा 'राष्ट्रपिता' म्हणून गौरव केला. १९४२ मध्ये महात्माजींच्या नेतृत्वाखाली 'चले जाव' चे जागतिक कीर्तीचे आंदोलन झाले. गांधींनी भारतात आयुष्याची १३ वर्षे तुरुंगात काढली.

१९४७ मध्ये देश स्वतंत्र झाला आणि ज्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी साऱ्या आयुष्याचा संग्राम केला, ते स्वातंत्र्य त्यांना फक्त ६ महिने अनुभवता आले. सन २००० मध्ये 'बीबीसी'ने जगभरातील विविध क्षेत्रांतील नामवंत १० हजार व्यक्तींना एक प्रश्न विचारला होता, तो असा- इ. स. १००० ते २००० या हजार वर्षांत जगात झालेला सर्वश्रेष्ठ माणूस कोण? १० हजारांपैकी ८,८८६ लोकांनी 'गांधीजी' असे उत्तर दिले होते. गांधीजींचे वैश्विक असणे भारताच्या पंतप्रधानांना माहीत नसेल आणि ॲटनबरोंच्या चित्रपटाने ते माहीत झाले असेल तर ती स्वत:ला विश्वगुरू म्हणवून घेणाऱ्या व्यक्तीचे अपुरेपण सांगणारी गोष्ट म्हणावी लागेल. अर्थात या अपुरेपणाबद्दल आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. कारण जो माणूस आपल्या पक्षाच्या जन्मदात्या संघाला विसरतो, त्याने गांधी लक्षात ठेवला नसेल तर ती काही फारशी खेदाची गोष्ट नाही.

गांधी हे जन्माने गुजराती होते हे तरी तुम्हाला माहीत असेल अशी आशा, अपेक्षा ठेवण्यास हरकत नसावी. ज्या देशातील विद्यापीठांमध्ये गांधीवाद सातत्याने शिकविला जातो, ज्या देशाच्या चलनी नोटांवर महात्मा गांधी यांचे छायाचित्र आहे आणि ज्या देशाच्या अनेक विकासात्मक योजनांचे नाव महात्मा गांधी या शब्दांनी सुरू होते, त्या देशांमध्ये पंतप्रधान पदावरील व्यक्तीकडून चुकीची माहिती प्रसारित होत असेल तर त्याचा मोठ्या प्रमाणावर निषेध होणे गरजेचे आहे. 'गांधी' चित्रपटामुळेच गांधीजी जगभरात लोकप्रिय झाले असे म्हणणे सर्वस्वी चुकीचे आहे. हा चित्रपट प्रदर्शित होण्याआधीच जगाला गांधींची महती ज्ञात झाली होती. गांधींचा महिमा हिमालयाएवढा आहे. त्याची उंची कमी करता येणार नाही. महात्मा गांधी हीच भारताची ओळख आहे आणि तीच यापुढेही कायम राहणार आहे.

# संत मंहतांच्या उपस्थितीत राधाकृष्ण बाल संस्कार शिबिराचा समारोप

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या पंधरा दिवसापासून ह. भ.प.भागवताचार्य बबन देवा जोशी अंबिका चौक बीड यांच्याकडे उन्हाळी बाल सुसंस्कार शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरामध्ये आध्यात्मिक शिक्षण व मूल्य शिक्षण याचे ज्ञान मुलांना देण्यात आले. आपले जीवन आनंदी कशी जगावे हे शिकवले या शिबिराच्या सांगता समारंभास रामगडाचे महंत ह भ प योगीराज स्वामी बाबा व दैनिक चंपावती पत्र चे उपसंपादक संतोष जी क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती .



या सांगता शिबिरामध्ये गेल्या पंधरा दिवसांमध्ये मुलांनी अध्यापन केलेले गायन ,वादन , स्टेजवर कसे बोलावे,तसेच भगवद्गीता पाठ हा महाराजांच्या समोर मुखोद्गत पठण केले , तसेच गायन करून दाखवले संपूर्ण पंधरा दिवसाचे प्रात्यक्षिक पाहून गडाचे हभप योगीराज महाराज स्वामी यांनी समाधान व्यक्त केली. या शिबिर समारोह प्रसंगी ह भ प बालाजी महाराज शेंडगे , तिंतरवणी, ह भ प धूराजी महाराज कोळेकर, पोलीस अधिकारी गरजे साहेब, दैनिक चंपावती पत्राचे महादेव नाना साळुंके, ह भ प दादाराव खांडे, दैनिक रिपोर्टर चे आनंद घीगे सर, कृष्णा पांगरे, आसाराम पवळ, परमेश्वर जाधव, ढोरमारे कल्याणराव बांड ,लोकप्रभा चे शेजाळ सर,शिवाजी महाराज खवणे, सतीश महाराज, विकास जायभय, भास्कर गचांडे, सौ गोदावरी जायभाय, प्रतिभाताई गायकवाड, प्राध्यापक गोरक्ष पवळ, राजेश ओस्त्वाल, ज्ञानेश्वर पवळ , बंडू देवा जोशी गयाताई तुरुकमारे, सहदेव जोशी, यांचा सत्कार करण्यात आला सुसंस्कार शिबिरातील मुलांचे माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत दैनिक चंपावती पत्रचे महादेव साळुंके यांनी बालसंस्कार शिबिर व बबन देवा महाराजांच्या कार्याचा गुणगौरव करणारे फ्रेंम प्रदान करण्यात आली. शिबिराच्या सांगता प्रसंगी शिबिरातील काही मुला मुलींनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला विजय जोशी कृष्णा जोशी व सहदेव जोशी यांचे विशेष सहकार्य लाभले..नंतर सर्वांनी सहभोजनाचा आनंद घेतला.

# इंडिया आघाडी २९५ पेक्षा अधिक जागा जिंकणार

## मल्लिकार्जून खर्गे यांचा विश्वास,नवी दिल्लीत इंडिया आघाडीची बैठक संपन्न

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**आतापर्यंत झालेल्या मतदानातील जनतेच्या सर्व्हेची माहिती आम्ही घेतली. यावेळी देशभरात लोकसभा निवडणूकीत कमीत कमी २९५ जागा मिळणार असल्याचा आमचा सर्व्हे आहे. तसे तर सर्व्हे अनेक होतात. तसा सरकारी सर्व्हेही होतो. पण आमचा सर्व्हे सरकारी नाही तर जनतेचा सर्व्हे आहे. त्यामुळे किमान २९५ जागा इंडिया आघाडीला मिळणार असल्याचा विश्वास व्यक्त करत या जागांमध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. पण या संख्येत घट होणार नाही, असा विश्वास मल्लिकार्जून खर्गे यांनी व्यक्त केला.**



लोकसभा निवडणूकीच्या शेवटच्या टप्प्यातील अर्थात सातव्या टप्प्यातील मतदान संपण्यापूर्वीच नवी दिल्लीत इंडिया आघाडीची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे, सोनिया गांधी, राहुल गांधी, प्रियंका गांधी, राष्ट्रवादीचे शरद पवार, शिवसेना उबाठा गटाचे अनिल देसाई, आम आदमीचे पार्टीचे प्रमुख अरविंद केजरीवाल, समाजवादी पार्टीचे अखिलेश यादव, माकपचे नेते सीताराम येचुरी, डिमकेचे नेते टी बालू, आरजेडीचे तेजस्वी यादव, झारखंडचे मुख्यमंत्री चंपाई सोरेन यांच्यासहीत अनेक नेते उपस्थित होते. इंडिया आघाडीची बैठक झाल्यानंतर सर्व नेत्यांनी मिळून प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी इंडिया आघाडीच्यावतीने मल्लिकार्जून खर्गे यांनी यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी मल्लिकार्जून खर्गे म्हणाले की, बैठकीला आघाडीतील सर्व सदस्य राजकिय पक्ष सहभागी झाले होते. झालेल्या बैठकीत मतदानाच्या दिवशी कार्यकर्त्यांनी घ्यावयाच्या काळजीबाबत आणि मतमोजणीच्या दिवशी घ्यावयाच्या काळजीबाबत कार्यकर्त्यांना कोणत्या प्रकारच्या सूचना द्यायच्या याविषयी चर्चा करण्यात आली. तसेच सध्याचे वातावरण बघता गडबडी होण्याची शक्यता गृहीत धरून प्रत्येक राज्यातील इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांकडून योग्य ती काळजी घेण्याविषयी सूचना देण्यात आली आहे. मल्लिकार्जून खर्गे पुढे बोलताना म्हणाले की, मतमोजणीच्या दिवशी काही गडबडी होण्याची शक्यता गृहीत धरून आम्ही निवडणूक आयोगाच्या प्रमुखांची भेट घेणार आहोत. तसेच मतमोजणीच्या दिवशी कोणते आदेश दिले, द्यावयाचे राहिले आहेत, तसेच भाजपा आणि त्यांच्या नेत्यांच्या विरोधात केलेल्या तक्रारीच्या अनुषंगानेही आम्ही निवडणूक आयोगाशी चर्चा करणार असल्याचे यावेळी सांगितले.

# ईशान्य भारतात मान्सूनबरोबरच पुराचे संकट

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

देशातील बहुसंख्य जनता उष्णतेच्या लाटेमुळे त्रस्त झाली असताना ईशान्येतील राज्यांना मात्र अतिवृष्टीमुळे मे महिन्याच्या अखेरीसच पुराचा सामना करावा लागत आहे. 'रेमल' चक्रीवादळाच्या प्रभावामुळे अतिवृष्टी झाल्यानंतर वेळेआधीच दाखल झालेल्या मान्सूनने पावसाळ्याच्या सुरुवातीलाच ईशान्येतील नागरिकांची चिंता वाढविली आहे. आसाम आणि मणिपूरमधील ब्रह्मपुत्रा, बराक आदी नद्यांना महापूर आल्याने लोकांची झोप उडाली आहे.

आसाममध्ये पूरस्थिती गंभीर असून राज्यातील ९ जिल्ह्यांतील दोन लाख नागरिक प्रभावित झाले आहेत. राज्यात चक्रीवादळ, पूर आणि पावसाशी संबंधित विविध घटनांत सहा जणांचा मृत्यू झाला आहे. ब्रह्मपुत्रा आणि बराकसह इतर नद्याही धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. राज्यातील नागाव, करीमगंज, हैलाकंडी, प.कारबी अँगलाँग, काच्छर, होजाई, गोलाघाट, कारबी ॲंगलिंग आणि दिमा हसाओ या जिल्ह्यांना पुराचा सर्वाधिक फटका बसला आहे. रस्त्यांचे नुकसान झाल्याने बराक खो-यातील काच्छर, करीमगंज आणि हैलाकंडी या जिल्ह्यांचा उर्वरित ईशान्येशी संपर्क तुटला असून अनेक वाहने अडकून पडली आहेत.

# शेवटच्या सातव्या टप्प्यात ५८.३ टक्के मतदान

## पंतप्रधानांसह ४ केंद्रीय मंत्र्यांचे नशीब ईव्हीएममध्ये बंद



**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**लोकसभा निवडणुकीच्या अखेरच्या सातव्या टप्प्यात ८ राज्य व केंद्रशासित प्रदेशातील ५७ मतदारसंघात मोठ्या उत्साहात ५८.३ टक्के मतदान पार पडले. या बरोबरच पंतप्रधानांसह ४ केंद्रीय मंत्र्यांचे नशीब ईव्हीएममध्ये बंद झाले आहे.**

शेवटच्या टप्प्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाराणशी मतदारसंघात मतदान झाले. याशिवाय मोदी यांच्या मंत्रिमंडळातील ३ केंद्रीय मंत्र्यांचेही नशीब ईव्हीएम मशीनमध्ये बंद झाले. केंद्रीय मंत्री डॉ. महेंद्र नाथ पांडेय चंदौली येथून अनुप्रिया पटेल मिर्झापूरमधून आणि राज्यमंत्री पंकज चौधरी महाराजगंज मतदारसंघातून नशीब आजमावत आहेत. बिहारच्या आरा येथून केंद्रीय मंत्री आर.के. सिंह निवडणूक लढवत आहेत. पाटलीपूत्र येथून राजदचे नेते लालूप्रसाद यादव यांची कन्या मीसा भारती नशीब आजमावत आहेत. शेवटच्या टप्प्यातील मतदान पार पाडण्यासाठी १ कोटी ९ लाख मतदान केंद्रांवर १० कोटी ९ लाख कर्मचारी तैनात करण्यात आले होते. या अंतिम टप्प्यात एकूण १० कोटी ६ लाख मतदारांची नोंद होती. त्यामध्ये ५ कोटी २४ लाख पुरुष आणि ४ कोटी २८ लाख महिला मतदारांचा समावेश होता.

**पश्चिम बंगालमध्ये ईव्हीएम मशीन पळविल्या**

पश्चिम बंगालमधील २४ परगणा जिल्ह्याच्या जयनगर मतदारसंघातील कुलताली येथे संतप्त जमावाने मतदान केंद्रातील ईव्हीएम मशीन आणि कागदपत्रे पळवून नेल्याची घटना घडली. या जमावाने निवडणूक साहित्य एका डबक्यात फेकून दिले. भाजप आणि माकपच्या विरोधात घोषणा देणाऱ्या या जमावात तृणमूल काँग्रेसच्या कार्यकर्त्यांचा समावेश असल्याचा आरोप आहे.

**उष्माघाताने १५ कर्मचाऱ्यांचा मृत्यू**

उत्तरप्रदेशच्या मिर्झापूरमध्ये मतदान केंद्रावर कार्यरत १३ निवडणूक कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या कर्मचाऱ्यांचा ताप आणि उच्च रक्तदाबामुळे मृत्यू झाल्याची माहिती आहे. मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांमध्ये ७ होमगार्ड जवान, ३ सफाई कर्मचारी, १ क्लार्क आणि एका शिपायाचा समावेश आहे. दरम्यान, ओडिशातील जाजपूर जिल्ह्यात ओलईचंदनपूर येथील एका मतदान केंद्रातील कर्मचाऱ्याचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. बालासोर जिल्ह्यात मतदानासाठी रांगेत लागलेल्या एका वृद्ध व्यक्तीचा उष्माघाताने मृत्यू झाला.

# ५ जूनला केंद्रीय मंत्रिमंडळाला राष्ट्रपतींकडून डिनरचे निमंत्रण

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे. यानंतर लगेचच ५ जून रोजी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू या केंद्रीय मंत्रिमंडळाला फेअरवेल डिनर देणार आहेत. याचे आयोजन रात्री ८ वाजता केले जाणार आहे. १६ जूनला १७ व्या लोकसभेचा कार्यकाळ संपत आहे. त्यापूर्वीच नवीन सरकार स्थापन करण्यात येणार आहे.

प्रत्येक लोकसभेच्या कार्यकाळाच्या समाप्तीनंतर राष्ट्रपतींकडून मंत्रिमंडळाचा निरोप समारंभ आयोजित करण्यात येतो. यावेळी ५ जूनला याचे आयोजन करण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीचा शनिवारी सातवा टप्पा पार पडला. यानंतर सर्वांना निकालाची उत्सुकता आहे. सुमारे अडीज महिने चाललेल्या या लोकशाहीच्या कुंभमेळ्यात सत्ताधारी-विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोपाच्या जोरदार फैरी झाडल्या गेल्या आहेत. अनेक ठिकाणी मतदान केंद्रांवर गोंधळ घालण्याचे, ताब्यात घेण्याचे प्रकार घडले आहेत. याच्या तक्रारी देखील निवडणूक आयोगाकडे आलेल्या आहेत. लोकसभा निवडणुकीसोबत ओडिशा, आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम या चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकाही पार पडल्या आहेत. यापैकी अरुणाचल आणि सिक्कीम विधानसभा निवडणुकांचे निकाल २ जूनला जाहीर होणार आहेत. तर ओडिशा आणि आंध्र प्रदेशचे निकाल ४ जूनला सार्वत्रिक निवडणुकांच्या निकालांसह जाहीर होणार आहेत.

# आरटीई प्रवेश प्रक्रियेला मुदतवाढ

## ४ जून पर्यंत पालकांनी अर्ज दाखल करावेत-मनोज जाधव

**बीड । प्रतिनिधी**

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता १७ मे पासून सुधारित आरटीई शाळा प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. बीड जिल्ह्यात १७ ते ३१ मेपर्यंत पालकांना ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत देण्यात आली होती. यानंतर ३० मे रोजी शिक्षण संचालक यांनी ४ जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे. मात्र ही मुदतवाढ अंतिम असेल, अशी सूचना शिक्षण संचालक यांनी दिली आहे.ऑनलाईन प्रवेश अर्ज दि. ४ जून या मुदतीपूर्वी भरावेत आरटीई शाळा प्रवेशासाठी ही अंतिम मुदतवाढ आहे. असे आवाहन शिवसंग्रामचे युवा नेते तथा आरटीई कार्यकर्ते मनोज जाधव यांच्या वतीने पालकांना करण्यात अली आहे.**

गेल्या १७ मे पासून पालकांकडून ऑनलाइन प्रवेश अर्ज करण्यासाठी पालकांचा वाढता प्रतिसाद दिसत आहे. नवीन बदलानुसार जिल्ह्यामध्ये २४९ शाळांमधील २ हजार १४९ जागांसाठी पालकांकडून ५ हजार ५१० अर्ज दाखल करण्यात आले आहेत. आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेच्या शाळा प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम मुदत ३१ मे होती. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ प्रवेश प्रक्रिया जूनमध्ये सुरु होत आहे. आरटीई २५ टक्के प्रवेश प्रक्रियेस दिनांक ३१ मे नंतर मुदतवाढ देण्यात येणार नाही. अशा सूचना शिक्षणाधिकारी प्राथमिक यांना शिक्षण संचालक यांनी पत्राद्वारे दिल्या होत्या. मात्र, पुन्हा ४ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून ही अंतिम असणार आहे.

## पान १वरून...

### शेतकरी संकटात,

मदत मिळवून देण्यासाठी काँग्रेसने दुष्काळ संदर्भात नेमलेल्या विदर्भाच्या समितीची आज बैठक पार पडल्याचे सांगितले. पुढे बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, ५ जून पासून विदर्भात काँग्रेस पाहणी दौरा करून त्यासंदर्भात अहवाल राज्य सरकार पुढे मांडून शेतकऱ्यांसाठी आम्ही मदतीची मागणी करणार असल्याचे सांगितले. तसेच विजय वडेट्टीवार म्हणाले की, शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडून कृषी मंत्री बाहेर आहेत, ते बाहेर असताना आयुक्तांची बदली होते. पूर्णवेळ सचिव नाही. खरीप हंगाम तोंडावर असताना बैठक होत नाही. खतांचा तुडवडा आहे, बियाणाचे दर वाढले, बियाण्यांसाठी लोक रांगेत उभे आहेत. या सर्व परिस्थितीवर उपाययोजना करण्याऐवजी सत्ताधारी परदेशात मजा मारत असल्याचा आरोपही यावेळी केला. राज्य सरकारच्या अनास्थेबाबत बोलताना विजय वडेट्टीवार म्हणाले की, शेतकरी जगला काय आणि मेला काय या सरकारला काय फरक पडतो? राज्यातील शेतकऱ्यांप्रती महायुती सरकारची अनास्था यामधून दिसत असल्याची टीकाही यावेळी त्यांनी केली.

----------

### खासगी संघाकडून

जनावरांना होणाऱ्या आजारांमुळे उत्पादन खर्चात वाढ झाली आहे. या परिस्थितीत खासगी दूध संघांनी केलेली दरातील कपात शेतकऱ्यांसाठी आघातच आहे. राज्य सरकारने ५ रुपये प्रति लीटर अनुदान देण्याची घोषणा केली असली तरी, अटींमुळे अनेक शेतकरी या योजनेपासून वंचित राहले आहेत. वेळेवर माहिती अपलोड न केल्याने अनेक शेतकर्यांना अनुदानाचा लाभ मिळू शकला नाही.

------------

### देशात पुन्हा एनडीए

इंडिया आघाडीला ३९ टक्के, बीआरएसला २० टक्के, एआयएमआयएमला २ टक्के आणि इतरांना ६ टक्के मते मिळाल्याचा अंदाज आहे. आंध्र प्रदेशात एनडीएला ५३ टक्के, भारतीय आघाडीला ३ टक्के, वायएसआरसीपीला ४२ टक्के आणि इतरांना २ टक्के मते मिळण्याची शक्यता आहे. जागांचा आकडा पाहिल्यास एनडीएला येथे बहुमत मिळताना दिसत आहे. आंध्र प्रदेशात २१ ते २४ जागा एनडीएच्या खात्यात जाणार आहेत. तर, वायएसआरसीपीला ० ते ४ जागा मिळण्याचा अंदाज आहे. आंध्र प्रदेशमध्ये इंडिया आघाडी आपले खाते न उघडण्याची शक्यता आहे.

------------

### महाराष्ट्रात भाजपला धक्का

त्यामुळे विविध एक्झिट पोलमध्ये महाराष्ट्रात महायुतीला २२ ते २४ जागा मिळतील, असा अंदाज सांगितला आहे. तर मविआला २३ ते २६ जागा मिळतील असा अंदाज आहे. त्यामुळे महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा रथ सुसाट चालणार असल्याचे दिसत आहे.

----------

### अरविंद केजरीवाल

तिहार जेलमध्ये आत्मसमर्पण करावं लागणार आहे. कोर्टाने अरविंद केजरीवाल यांना १० मे रोजी निवडणुकीचा प्रचार करण्यासाठी २१ दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर केली होता. त्यांचा जामीन २ जूनला संपत असून, रविवारी आत्मसमर्पण करावे लागणार आहे.

------------

### एम फॅक्टरला माधवं

मतदार संघातही पंकजा मुंडे यांना फटका बसला. एकंदरीत मनोज जरांगे फॅक्टर, मराठा समाज आणि मुस्लिम समाज असे थ्री एम पंकजा मुंडे यांच्या विरोधात व बजरंग सोनवणे यांच्या बाजूने या निवडणुकीत होते. तर माधवं म्हणजेच माळी, धनगर आणि वंजारी, बंजारी हे पंकजा मुंडे यांच्या बाजूने पुर्ण ताकदीने उभे राहीले. बीड मतदार संघात ओबीसी ९ लाख तर मारवाडी, ब्राम्हण ५५ हजार आहे. मराठा ६ लाख ५० हजार, मुस्लिम २ लाख ५० हजार आणि मागासवर्गीय समाज २ लाख ५० हजार असल्याचा अंदाज आहे. त्यामुळे बजरंग सोनवणे यांच्या बाजूने थ्री एम तर पंकजा मुंडे यांच्या पाठीशी माधवं राहिल्याने हा सामना चुरशीचा झाला. २१ लाख ४२ हजार ५४७ मतदार संख्या असलेल्या या मतदारसंघात १५ लाख १९ हजार ५२३ मतदान झाले आहे. ७०. ९२ टक्के मतदान झाले असून यामध्ये सर्वाधिक आष्टी ७४. ७९ टक्के तर सर्वात कमी बीड विधानसभा मतदारसंघात ६६. ०९ टक्के मतदान झाले आहे. पंकजा मुंडे यांना आष्टी आणि परळी या दोन मतदार संघात मताधिक्य मिळण्याची शक्यता असून बजरंग सोनवणे यांना बीड आणि गेवराई या दोन मतदार संघात मतांची आघाडी मिळण्याची शक्यता आहे. परळी मतदार संघात १ लाखापर्यंत मताधिक्य हे मुंडे यांना मिळणार असल्याचे म्हटले जात असल्याने त्याच या चुरशीच्या सामन्यात बाजी मारतील, असा अंदाज आहे. विविध एक्झीट पोलनुसार पंकजा मुंडे याच बीडमधून विजयी होतील, असा अंदाज आहे.

## बचुटे ईशांत, शेख आरेफ, शेख लईक़ यांचे इयत्ता दहावीत घवघवीत यश

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील बचुटे ईशांत मनोज याने ९१.६०, शेख आरेफ अशफाक याने ८६.८० आणि शेख लईक़ युसूफ़ याने ७५.८० टक्के गुण मिळवून इयत्ता दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

बचुटे ईशांत चे आई-वडील सौ व श्री मनोज बचुटे हे सहशिक्षिका व सहशिक्षक आहेत तसेच शेख आरेफ चे आई-वडीलही सहशिक्षिका व सहशिक्षक आहेत. शेख लईक़ हा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांचा मुलगा आहे.



तिघांनीही इयत्ता दहावीत मिळविलेल्या घवघवीत यशामुळे त्यांचे समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे (नाना), एम.ए.रऊफ (दादा), मनोज बचुटे सर, शेख मज़हर (ताया), शेख अशफाक सर आणि एस.एम.युसूफ़ यांनी तिघांचेही अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी हृदयी शुभेच्छा दिल्या आहेत.

# फेसबुक/व्हॉटसऑप, व्यसनाधीनता व राजकारणामुळे ग्रामीण भागातील तरुण आळशी होत चाललाय

### सगळ्यांनाच राजकारणात स्वारस्य असतं;पण राजकारण कामधंदा सांभाळून करायचं असतं एवढही भान तरुण पिढीला नाही !

**ज्योतीराम पांढरपोटे । माजलगाव**

फक्त फेसबुक आणि व्हाट्सअपवर शेतकऱ्यांच्या पोस्ट करणारा युवक प्रत्यक्षात मात्र दिवसभर स्टॅण्डवर पडीक दिसतो. २३-२४ वय झालं कि १९-२० वर्षाच्या मुलीला लग्न करून घरी आणायचं,चार दिवसांचं कौतुक संपलं कि तिला कामावर जुंपायच आणि स्वतः मात्र मस्तपैकी स्टॅण्डवर गप्पा मारात पत्ते खेळत बसायचं असाच सध्या ग्रामीण भागातील तरुणांचा कार्यक्रम आहे.

बायकोला आठवडाभराचा रोज मिळाला कि त्यातून स्वतःसाठी चार पाचशे रुपये घ्यायचे,चहा दारू आणि पत्त्यांत उडवायचे एवढाच ग्रामीण भागातील तरुणांचा दिनक्रम असतो.कोणत्या नेत्याने काय केलं, कुठं कुणी काय डाव टाकले,निवडणूक, राजकारण याच्याबाहेर हा तरुण यायलाच तयार नाहीये. वर्षातून येणारे सगळे सण साजरे करायचे त्यासाठी स्थानिक नेत्यांकडून पैसे गोळा करायचे, विविध महापुरुषांच्या जंयतीत डिझे समोर दारु पिऊन डिजेच्या तालावर झिंगायचं व गणपतीच्या मंडपाखाली पत्त्याचे डाव मांडायचे आणि पुढच्या ४-५ महिन्याची सोय करायची.नेत्याला सुद्धा माहित असतं या तरुणांना कुत्र्यासारखा आपलं गुलाम कस बनवायचं.पैसे फेकले कि,हि तरुण ताकद अलगद आपल्या हाताखालची मांजर बनते.राज्यात कोणत्याही कोपऱ्यात जा हीच परिस्थिती दिसेल. सगळेच वाईट आहेत असे नाही, पण जे चांगले आहेत ते हाताच्या बोटावर मोजण्याइतके सुद्धा सापडणार नाहीत.कधी एखाद्या गावात पारावर बसलेल्या मुलांना जाऊन विचाराव कि शेतात काम करायचंय, तीनशे रुपये रोज मिळेल,चलता का ? सगळी पोरं एका क्षणात गायब होतात.घरी बायको म्हणून आणलेली २०-२१ वर्षाची कोवळी पोर यांच्यासाठी आता हक्काची गुलाम असते.ती कमावते आणी यांनी मजा मारायची.घरातील स्त्री शेतावर राबत असताना हा महान आत्मा स्टॅण्डवर उभा राहून आपल्या मान-सन्मानाच्या गप्पा झोडत असतो. एखादा व्हाट्सअप वर शेतीसंबंधी मेसेज आला कि मस्तपैकी पुढच्या ग्रुप वर फॉरवर्ड करून शेतकऱ्यांसाठी काहीतरी केल्याचा आव आणतो. एखाद्या गावात जाऊन शेती आंदोलनाला येण्यासाठी आवाहन करावं तर हीच शेतकऱ्यांची मुलं पैसे किती मिळणार याचा हिशोब करतात,पण गावात स्टॅण्डवर आपला फोटो छापलेला किमान एक तरी बॅनर झळकला पाहिजे असली भुक्कड स्वप्ने पाहतात.मग यासाठी एखाद्या नेत्याचा वाढदिवस, सण,जयंत्या असतातच. गावाच्या राजकारणात धडाडीने उतरणारा आजचा युवक घरासाठी काहीतरी काम करायच म्हटलं तर क्षणार्धात मागे हटतो.त्याला काम नकोय,कुणीतरी हातात पैसे आणून द्याव असं त्याला वाटतंय.आणि यासाठी हक्काची गुलाम बायको आणि हक्काचा मालक नेता हे दोन मुख्य स्रोत असताना त्याला भविष्याची चिंता सतावतात नाही. काय अपेक्षा करावी यांच्याकडून घंटा?क्रांती घडणार यांच्या हातून ? तोंडात तंबाखू आणि मावा, डोक्यात नुसतं राजकारण,हातात कुणाचातरी झेंडा, आणि डोळ्यात भाला मोठा शून्य अशी युवकांची अवस्था आहे.राजकारणात इंटरेस्ट कुणाला नसतो ? सगळ्यांनाच राजकारणात स्वारस्य असतं... पण हे घर,काम-धंदा सांभाळून करायचं असतं एवढही भान या तरुण पिढीला राहीले नाही.







आपण असला मूर्खपणा करतोय म्हणूनच दानवे सारखे भिकारचोट राजकारणी आपल्याबद्दल म्हणजे शेतकऱ्यां बद्दल अपशब्द वापरायची हिम्मत दाखवू शकतात एवढही कळत नाहीये या तरुण पिढीला.फक्त दानवेच नाही तर सगळेच नेते आज शेतकऱ्यांबद्दल असलाच दृष्टिकोन बाळगून आहेत, फक्त दानवे उघडउघड बोलले, आणि बाकीची खाजगीत बोलतात इतकेच.आणि याच कारण म्हणजे शेतकऱ्यांची मुले, ज्यांच्या जीवावर शेतकरी उज्ज्वल शेतीचं स्वप्न पाहतोय ती या नेत्यांच्या हातचं बाहुलं बनली आहेत

अॅड.नारायण गोरे पाटील,शेकापा नेते.

## सोशल मीडियाचा वापर विचार पूर्वक करावा; शांतता राखण्याचे पोलीस निरीक्षक कोळी यांचे आवाहन !

माजलगाव । प्रतिनिधी

सोशल मीडिया हे खूप झटपट माहिती प्रसारित करण्याचे मध्यम झाले आहे त्या मुळे तरुण पिडीच्या लोकणांनी याचा वापर खूप विचार पूर्वक करावा व शांतता प्रस्थापित करावी असे आव्हान पोलीस निरीक्षक ग्रामीण पोलीस स्टेशन माजलगाव चे कोळी साहेब यांनी शांतता समितीच्या बैठकीत बोलताना आव्हान केले. दि ३१ मे रोजी मंजरथ, मोठेवाडी, गंगामसला, खरातआडगाव,येथे लोकसभा निवडणुकीच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीच्या बैठकीचे आयोजित केले होते या वेळी पो.निरिक्षक,कोळी साहेब पोलीस स्टेशन माजलगाव ग्रामीण हद्दीतील मंजरथ , मोठेवाडी गंगामसला, खरात आडगाव येथे लोकसभा निवडणूक निकाल अनुषंगाने शांतता कमिटी बैठक घेण्यात आली बैठकीमध्ये सरपंच, उपसरपंच,प्रतिष्ठित नागरिक, शांतता कमिटी सदस्य व, ज्येष्ठ नागरिक यांची उपस्थिती होती या वेळी शांतता समितीच्या बैठकीत बोलताना पो .निरीक्षक कोळी साहेब म्हणाले की, लोकसभा निवडणुकीचा निकाल ४ जून रोजी लागणार आहे त्या अनुषंगाने सर्व तयारी पूर्ण केली असून मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांवर, फेसबुक व्हाट्सआप आदी प्रसार माध्यमा वर पोलिसांची करडी नजर असणार आहे त्या मुळे तारूणांनी समाजात तेढ निर्माण होईल अशा कमेंट किंवा मचक्रूर प्रसारित करू नये कारण हा मोठा गुन्हा होऊ शकतो त्या मुळे तरुणांनी फार विचार पूर्वक तीन चार दिवस फक्त ओन्ली एडमीन असे ग्रुप करावे सोशल मीडियावर कोणतीही जातीय तेढ निर्माण करणारी



पोस्ट आणि त्या पोस्टला कॉमेंट करणाऱ्याची गय केली जाणार नसून त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्यात येणार आहे.

गावागावात जाऊन शांतता प्रस्थापित करण्यासाठी बैठकाचे आयोजन करण्यात आले पो.निरीक्षक ग्रामिण पो.स्टेशनचे कोळी साहेब यांनी लोकसभा निवडणूक मिरवणुकीच्या पार्श्वभूमीवर ही डीजे ला पूर्ण बंदी असणार असल्याचे सांगून जे कोणी कायदा व सुव्यवस्थेच्या आड येईल त्यांच्यावर कडक कारवाही करण्यात येईल व सोशल मीडियावर पोलीसांचे बारकाईने लक्ष आहे त्यामुळे काही आक्षेपार्ह पोस्ट टाकुच

नये व ग्रुप चे एडमीन यांनी तीन चार दिवस फक्त ओन्ली एडमीन असे ग्रुप करावे जेणे करून काही दिवस कोणालाही समाजात तेढ निर्माण करण्यासारख्या पोस्ट ग्रुप वर टाकता येणार नाहीत यांची काळजी ग्रुप एडमीन ने घ्यावी. असे पी आय कोळी साहेब यांनी या बैठकीत उपस्थित नागरिकांना बोलताना संगीतले पोलीस स्टेशन माजलगाव ग्रामीण हद्दीतील मंजरथ ,मोठेवाडी, गंगामसला खरात आडगाव,

येथे लोकसभा निवडणूक निकाल अनुषंगाने शांतता कमिटी बैठक घेण्यात आली बैठकीमध्ये सरपंच, उपसरपंच,प्रतिष्ठित नागरिक, शांतता कमिटी सदस्य व, ज्येष्ठ नागरिक यांची बैठक घेऊन लोकसभा निवडणूक निकाल संदर्भाने माननीय पोलीस अधीक्षक साहेब यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे सूचना मा पोलीस निरीक्षक कोळी साहेब यांनी दिल्या आहे व शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

पान ६ वरून...

### पत्रकार संघाचे नवनिर्वाचित

केले त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते दहावी परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थीचा पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी असंख्य पालक वर्ग उपस्थित होता. यामध्ये कुलकर्णी कौशिकी महेंद्र ९५ टक्के, कणसे आरती शामराव ९२.६ टक्के, कारगुडे पूजा अशोक ९०.४०, चाळक श्रुती बाळासाहेब ९२.२ टक्के. ठोसर कल्याणी नारायण ८९टक्के, पानखडे पायल दामोदर ८८.८ टक्के, पंडित कुलदीप केशव ८५.५ टक्के, वरील सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. विद्यार्थी वर्गांना प्रोत्साहन मिळावे म्हणून हा कार्यक्रम वरील संस्थेने आयोजित केला होता यावेळी चांगला प्रतिसाद मिळाला. याप्रसंगी अनिल बोर्डे व श्री प्रा. भानुदास फलके यांनी मेहनत घेतली. तर विनोद चव्हाण सर यांचे या कार्यक्रमाला विशेष सहकार्य लाभले. याप्रसंगी ग्राहक पंचायत बीड जिल्हा उपाध्यक्ष व जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था गेवराई अध्यक्ष अनिल बोर्डे व ग्राहक पंचायत गेवराई अध्यक्ष प्रा. भानुदास फलके ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था कोषाध्यक्ष मोहनराव राजहंस, सहकार्य कार्यवाह कुंदा जोशी सदस्य सुलभा बोर्डे, ग्राहक पंचायत कार्यकर्ते अशोक देऊळगावकर, केशव पंडित, महेंद्र कुलकर्णी दामोदर पानखडे बालासाहेब चाळक शेख हनीफ भाई इत्यादी जनसमूह होता.

### खत आणि बियाणे यांची साठेबाजी

कंपनीच्या बियाणे ऐवजी इतर कंपन्यांची बियाणे विकण्यासाठी कृषी सेवा केंद्र प्रयत्न करत असल्याची ओरड शेतकऱ्यांमधून होत असते.

बहुतांश वेळा बोगस बियाणांमुळे अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणीच्या संकटाला सामोरे जावे लागले आहे. त्यामुळे आर्थिक बोजा सहन करावा लागला.तसेच उत्पादनातही घट झाल्याने तेथे ही तोटा सहन करावा लागला.अशा दुहेरी संकटात शेतकरी भरडला गेला होता.त्यामुळे आता शेतकऱ्यांना विश्वासाहर्ता असलेल्या कंपन्यांचीच बियाणे हवी आहेत. मात्र व्यापाऱ्याकडून इतर बियाण्यांसाठी आग्रह केला जात असेल शेतकऱ्यांनी ताबडतोब शिवसंग्रामशी संपर्क साधावा असे आवाहन चौधरी यांनी केले आहे. अडला हरी..... म्हणतात त्याप्रमाणे पेरणीच्या लगबगीत मिळेल ते बियाणे घेण्याकडे काही शेतकऱ्यांचा ओढा आहे. मात्र अशा बियाणांमुळे जर नुकसान झाले तर त्याला जबाबदार कोण? असाही प्रश्न निर्माण होतो आहे. या सर्व शेतकऱ्यांच्या अडचणीचा विचार करून शासन आणि प्रशासनाने तातडीने भरारी पथक तयार ठेवून शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या भूमिकेतून कार्य करावे.अशी आग्रही मागणी शिवसंग्रामचे ज्ञानेश्वर चौधरी करण्यात येत आहे.

### लोकनेते सुदंरराव सोळंके साखर

शिंदे,शहाजी कोलते, सौ.शशीकला गांडगे तसेच कार्यकारी संचालक आर.सी.बडगुजर, कारखाना सचिव सुरेश लगड, मुख्य शेतकी अधिकारी आर.आर.देशमुख, ऊस पुरवठा अधिकारी बी. ई.भोसले यांच्यासह ऊसतोड मुकादम, वाहतुक ठेकेदार, कर्मचारी उपस्थित होते.तरी ज्या ऊसतोड, वाहतुक ठेकेदार यांना करार करावयाचे आहेत. त्यांनी तात्काळ शेतकी कार्यालयाशी संपर्क साधुन, कराराची पुर्तता करावी.असे आवाहन व्हा.चेअरमन जयसिंह सोळंके,शेतकी अधिकारी देशमुख यांनी केले.

### रमेश आडसकर यांच्या

रुग्णालय या ठिकाणी सुद्धा ग्रामीण भागातील गोरगरीब लोक त्यांना डब्याची ही सोय कमी जास्त प्रमाणात होत असते त्यामुळे एक वेळचं का होईना वाढदिवसानिमित्त आपण फळ वाटप करून हातावरचे पोट असणारे मजूर लोकांना दोन-चार दिवसाचा किराणा दिला त्यात आपल्याला आनंद मिळाला व खऱ्या अर्थाने आमचे नेते रमेशराव आडसकर साहेब यांचा वाढदिवस साजरी झाला अशी भावना

## मतमोजणी प्रक्रियेविषयी जिल्हा निवडणूक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांची मुलाखत

**बीड । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीची मतमोजणी मंगळवार दिनांक ४ जून रोजी होणार आहे. ३९ बीड लोकसभा मतदारसंघातील मतमोजणी नाथापूर रोडवरील शासकीय तंत्रनिकेतन येथे होणार आहे.या ठिकाणी कशाप्रकारे व्यवस्था करण्यात आली याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी बीड आकाशवाणीला दिली.

आकाशवाणी बीड केंद्राच्या १०२.९ वरून रविवारी दिनांक २ जून रोजी सकाळी ८. ४० मिनिटांनी ३९ बीड लोकसभा निवडणूक 'मतमोजणी प्रक्रिया



व्यवस्था आणि प्रशासनाची तयारी' याविषयी जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांची प्रसारित होणार आहे. ही मुलाखत माहिती अधिकारी अंजू कांबळे निमसरकर यांनी घेतली. या मुलाखतीत मतमोजणीसाठी सहा विधानसभा मतदार संघानिहाय करण्यात आलेली तयारी, येथील सुरक्षात्मक व्यवस्था, मतमोजणीची प्रक्रिया, माध्यमांसाठी करण्यात आलेली व्यवस्था या सर्व बाबींवर जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी प्रकाश टाकला आहे.

## संघर्षयोद्धा मराठी चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने धारूर शहरातील नागरिकांशी कलाकारांनी संवाद साधला

किल्लेधारूर । प्रतिनिधी

संघर्ष योद्धा या मराठी चित्रपटाचा प्रमोशनच्या निमित्ताने चित्रपटातील कलाकार यांनी धारूर शहरातील धनलक्ष्मी अर्बन बँकेच्या परिसरामध्ये नागरिकांशी संवाद साधून येत्या १४ जून २०२४ रोजी संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणाऱ्या चित्रपट पाहण्याचे आवाहन केले.

मराठा आरक्षण चळवळीचे नेते मनोज जरांगे पाटील यांच्या जीवनावर आधारित संघर्ष योद्धा हा मराठी चित्रपट १४ जून २०२४ रोजी संपूर्ण महाराष्ट्र प्रदर्शित होत आहे या चित्रपटाच्या प्रमोशनच्या निमित्ताने धारूर शहरात कलाकारांनी उपस्थित राहून




शहरातील नागरिकांना चित्रपट पाहण्याचे आव्हान केले. यावेळी चित्रपट अभिनेते रोहन पाटील चित्रपटाचे लेखक ,निर्माते त्यांचे सर्व सहकारी आणि धारूर शहरातील बालासाहेब जाधव, सुरेश शेळके ,संदीप शिनगारे , प्रशांत शिनगारे सह शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मुलींना शिक्षणासाठी पालकांनी पाठबळ द्यावे - सहकार महर्षी रामकृष्ण बांगर

**पाटोदा प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील हुतात्मा देवराव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाने यशाची परंपरा कायम ठेवली आहे. बारावी विज्ञान शाखेत १००% निकाल तर कला शाखेचा ९३% निकाल लागला असून गुणवत्तेत उत्तर उत्तर वाढ होत चालली आहे. तर नुकताच दहावी एसएससी परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून ९८.६०% निकाल लागला असून शाळेच्या गुणवत्तेत अधिक वाढ होताना दिसत आहे या यशाबद्दल सहकार महर्षी रामकृष्ण बांगर, सरपंच सौ. सत्यभामाताई बांगर, युवा नेता विजयसिंह बांगर व प्राचार्य दिनकर बांगर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे शिक्षकांचे पालकांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

१० वी व १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या बरोबर पालकांचा देखील गुणगौरव सोहळा हुतात्मा देवराव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय भायाळा येथे शनिवार दिनांक ०१/०६/



२०२० रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला यावेळी विद्यार्थ्यांबरोबर पालकांची ही विशेष उपस्थिती होती. या सत्कार समारंभ प्रसंगी आलेल्या मान्यवरांचे शाळेच्या वतीने स्वागत करण्यात आले तर सहकार महर्षी रामकृष्ण बांगर

### हुतात्मा देवराव विद्यालयाच्या १० वी व १२ वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा संपन्न

यांनी पालकांना आव्हान करत मुलींना शिक्षणासाठी पाठबळ द्या त्यांच्या शिक्षणाची जबाबदारी आम्ही घेऊ. साहेबांच्या आव्हानाला पालकांनी टाळ्या वाजवून मुलींनाही शिक्षणापासून आम्ही रोखणार नसून त्यांना शिकण्यासाठी प्रोत्साहन करू असेही सांगितले यावेळी आलेल्या मान्यवरांनी मनोगत व्यक्त करत शाळेबद्दल शिक्षकांबद्दल पालकांबद्दल विशेष कौतुक करत शुभेच्छा देखील दिल्या. यावेळी परिसरातील विद्यार्थी,पालक सर्व शिक्षक, प्राध्यापक, शिक्षोत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीबी नागरगोजे सर यांनी केले तर आभार प्राध्यापक सचिन पवार यांनी व्यक्त केले.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
रविवार दि.२ जून २०२४
४

# पुणे कृषी महाविद्यालयास साहिवाल गोवंश संवर्धन प्रकल्प मंजूर

## राज्यातील शेतकऱ्यांना जातिवंत गायी मिळण्यासाठी होणार मदत

पुणे : पुण्यातील कृषी महाविद्यालयाच्या पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागास साहिवाल गोवंश संवर्धन आणि संशोधनासाठी माहिती संकलन केंद्र (डेटा रेकॉर्डिंग युनिट) मंजूर झाले आहे. उत्तरप्रदेशातील मेरठ येथील केंद्रीय गाय संशोधन संस्थेतर्फे हे केंद्र मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे आता हे देशातील चौथे माहिती संकलन केंद्र ठरणार असल्याची माहिती राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाकडून जारी करण्यात आली आहे. त्यामुळे आता राज्यातील शेतकऱ्यांना जातिवंत गायी मिळण्यासाठी मदत होणार आहे.

देशभरात दुधासाठी प्रसिद्ध असलेल्या साहिवाल गोवंशाच्या आनुवंशिक क्षमतेचे संवर्धन, संशोधन आणि प्रसार करणे हा या माहिती संकलन प्रकल्पाचा मुख्य उद्देश असणार आहे. या प्रकल्पामुळे जातिवंत साहिवाल गोवंशाचे संवर्धन आणि दूध उत्पादन वाढीस मदत होणार आहे. केंद्रीय गाय संशोधन संस्थेमध्ये देशी गोवंशावर संशोधन केले जाते. दुधासाठी प्रसिद्ध साहिवाल,



गीर आणि कांकरेज गोवंशाची जातिवंत पैदास, दूध उत्पादनवाढीवर विशेष संशोधन प्रकल्प राबविला जातो. प्रकल्पाच्या तांत्रिक कार्यक्रमामध्ये भारतीय कृषी संशोधन संस्था तसेच देशातील विविध कृषी विद्यापीठांचा समावेश आहे.

सध्या देशामध्ये तीन प्रमुख माहिती संकलन केंद्र कार्यरत आहेत. यामध्ये पशुपालक तसेच सरकारी प्रक्षेत्रावरील जातिवंत दुधाळ देशी गोवंशाची नोंदणी घेतली जाते. जातिवंत पैदाशीच्या माध्यमातून आनुवंशिक सुधारणा केली जाते. संशोधन केंद्रातील उच्च वंशावळीच्या गाईंपासून जन्मलेल्या वळूचा गुणवत्ता चाचणी कार्यक्रमांमध्ये समावेश केला जातो. संशोधन आणि तंत्रज्ञान विस्ताराची गरज लक्षात घेऊन देशातील चौथे माहिती संकलन केंद्र महात्मा फुले कृषी विद्यापीठास मंजूर झाले आहे.

'या' गोवंशाची वैशिष्ट्ये :

साहिवाल गोवंश हा पंजाब प्रांतातील असून, देशातील सर्वोत्कृष्ट दुधाळ गोवंश आहे. हवामान बदलाच्या काळातही दूध उत्पादनामध्ये सातत्य असते. तसेच जातीच्या जनावरांमध्ये चांगली रोगप्रतिकारक शक्ती असते. या प्रजातीच्या गाई सरासरी २५०० ते २७५० लिटर प्रति वेत दूध देण्यास सक्षम असतात. या प्रजातीच्या गायीच्या दुधाचा फॅट ४.५ ते ४.७५ टक्के इतका असतो.

# आधुनिक पद्धतीने भुईमूग लागवड; एकरी विक्रमी १७ क्विंटल उत्पादन!



पुणे : शेती करताना शेतकरी प्रामुख्याने अधिक बाजारभाव मिळवून देणारी पिके घेण्याकडे ओढले जात आहे. त्यातच तेलबिया पिकांना पाहिजे तसा भाव मिळत नसल्याने अनेक शेतकरी भुईमूग, सोयाबीन या पिकांपासून दुरावले जात आहे. मात्र, अशातही काही शेतकरी हे तेलबिया पिकांचे भरघोस उत्पादन घेत आहे. आज आपण अशाच एका भुईमूग उत्पादक शेतकऱ्याची यशोगाथा पाहणार आहोत. ज्यांनी भर उन्हाळ्यात भुईमूग पिकाची लागवड करून, त्यातून त्यांनी एकरी विक्रमी १७ क्विंटल भुईमुगाचे उत्पादन घेतले आहे.

अंकित भोयर असे या शेतकऱ्याचे नाव असून, ते चंद्रपूर राजुरा तालुक्यातील पाचगाव येथील रहिवासी आहे. सध्याच्या घडीला शेतकरी तेलबिया पिकांची प्रामुख्याने पद्धतीने लागवड करतात. मात्र, प्रगतिशील शेतकरी अंकित भोयर यांनी आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती करण्याचा निर्णय घेतला. त्यांनी एक एकर शेतात आधुनिक पद्धतीने भुईमूग पिकाची लागवड केली. विशेष म्हणजे त्यांना भर उन्हाळ्यात विक्रमी उत्पादन देखील मिळाले आहे.

किती मिळाले उत्पादन?

सामान्यपणे भुईमूग तीन महिन्यांचे उन्हाळी पीक आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापर करून भुईमूग पीक घेतले तर त्याला कमी खर्च येतो. आणि उत्पादनही चांगले होते. असे शेतकरी अंकित भोयर सांगतात. त्यांना यंदा एका एकरात १७ क्विंटल भुईमुगाचे उत्पादन मिळाले आहे. ज्यास सध्या बाजारात सहा हजार रुपये प्रति क्विंटलचा दर मिळाला आहे. ज्यामुळे कमी उत्पन्न मिळणाऱ्या भुईमूग पिकातून त्यांनी नियोजनपूर्वक आर्थिक प्रगती साधली आहे.

आधुनिक पद्धतीचा अंगीकार :

''सध्याच्या घडीला शेतकऱ्यांनी कपाशी, सोयाबीन, गहू, हरभरा पिकांसोबत आधुनिक शेती पद्धतीने पीक घेतल्यास उत्पादन वाढले तर नक्कीच फायदा होतो. त्यामुळे सध्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शेती करणे गरजेचे झाले आहे. बाजारपेठेत विविध प्रकारच्या जातींचे वाण उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांनी उत्पादन वाढविण्यासाठी कृषितज्ज्ञांचा सल्ला घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला. तर शेतकऱ्यांना त्याचा मोठा फायदा होतो. प्रत्येक शेतकऱ्यांनी आता आधुनिक पद्धतीने शेती केली तर शेतकरी नक्कीच समृद्ध होईल.'' असा सल्ला शेतकरी अंकित भोयर यांनी शेवटी शेतकऱ्यांना दिला आहे.

# महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांवर एवढा आकस का?

## कांदा प्रश्नावर रोहित पवार आक्रमक

नाशिक : कर्नाटकातील बेंगलोर रोझ कांद्याबाबत नुकताच केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. केंद्राकडून बेंगलोर रोझ कांद्यावरील ४० टक्के शुल्क हटवल्यात आले आहे. ज्यामुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण आहे. राज्यातील कांद्याचे निर्यात शुल्क मात्र 'जैसे थे' ठेवण्यात आले आहे. त्यामुळे लासलगाव बाजार समितीतील शेतकऱ्यांनी केंद्र सरकारच्या निर्णयाचा निषेध केला, तसेच लिलाव देखील बंद पाडले. अशातच आता याच मुद्द्यावरून राष्ट्रवादीचे नेते (शरद पवार गट) रोहित पवार आक्रमक झाले आहेत. रोहित पवार यांनी कांदा निर्यात प्रश्नावरून भाजपवर जोरदार टीका केली आहे.

केंद्र सरकारने कर्नाटकात पिकवल्या जाणाऱ्या बंगळुरू रोझ व्हारायटीच्या कांद्यावरील ४० टक्के निर्यात शुल्क हटवले आहे. याआधी गुजरातमध्ये पिकवल्या जाणाऱ्या कांद्यासाठी निर्यातबंदी पूर्णतः



उठवली होती. परंतु महाराष्ट्राचा कांद्यावरील निर्यातबंदी अद्यापही उठवलेली नाही. इतर राज्यात पिकवल्या जाणाऱ्या कांद्याच्या व्हरायटी निर्यातीसाठी मुक्त करायच्या आणि महाराष्ट्रात पिकणाऱ्या कांद्याच्या व्हरायटीवर निर्यातबंदी लावायची असे का? केंद्र सरकारचा महाराष्ट्राच्या शेतकऱ्यांवर एवढा आकस का? असा सवाल रोहित पवारांनी सरकारला विचारला आहे. कर्नाटक सरकारने पाठपुरावा करून तिथल्या शेतकऱ्यांना न्याय मिळवून दिला. पण आपल्या राज्य सरकारला मात्र काहीही घेणेदेणे नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजितदादा आपण सर्वांनी पाठपुरावा करून या केंद्र सरकारला जाता जाता तरी एखादा चांगला निर्णय घेण्याची विनंती करावी, अशी मागणी करत रोहित पवारांनी खोचक टोला लगावला आहे. रोहित पवार यांनी 'एक्स' या समाजमाध्यमावर पोस्ट करत सरकारवर टीकास्त्र सोडले आहे.

शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ :

दरम्यान, काही दिवसांपूर्वी लोकसभा निवडणुकीचा प्रचार सुरू असताना नरेंद्र मोदींच्या सभेत शेतकऱ्यांनी कांद्याच्या मुद्यावरून जोरदार घोषणाबाजी केली होती. बंगळुरू येथील 'बेंगलोर रोज' हा कांद्याला शून्य टक्के निर्यातमूल्य आकारून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले गेले आहे का? असा प्रश्न देखील आता विचारला जात आहे.

# सोयाबीन पेरणीसाठी अशी घ्या काळजी

## भारतीय सोयाबीन संशोधन संस्थेच्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

खरीप हंगामात सोयाबीनचे चांगले उत्पादन घेण्यासाठी भारतीय सोयाबीन संशोधन संस्थेने शेतकऱ्यांना काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत. संस्थेने शेतकऱ्यांना उन्हाळ्यात ३ वर्षांतून एकदाच खोल नांगरणी करण्याचा आणि सेंद्रिय खतांचा वापर करण्याचा सल्ला दिला आहे. याशिवाय, संस्थेने शेतकऱ्यांना एकाच वेळी २ ते ३ सोयाबीनच्या वाणांची लागवड करण्याचा आणि योग्य अंतर राखून पेरणी करण्याचा सल्ला दिला आहे.

संस्थेच्या महत्वपूर्ण सूचना : शेतकऱ्यांनी सोयाबीन लागवडीसाठीची जमीन उन्हाळ्यात ३ वर्षांतून एकदाच खोल नांगरणी करावी. शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतातील माती क्रॉस पॅटर्नमध्ये नांगरून माती समतल करावी. तसेच पेरणीपूर्वी प्रति हेक्टरी ५ ते १० टन कुजलेले खत किंवा २.५ टन कोंबडी खत वापरावे. याशिवाय ५ वर्षांतून एकदा सब-सॉयलर मशिन वापरून जमिनीचा खोल थर फोडावा.

कशी कराल लागवड? : शेतकऱ्यांनी पेरणी दरम्यान शिफारस केलेले बियाणे रांगेत ४५ सेंटीमीटर आणि एका रोपापासून दुसऱ्या रोपापर्यंत ५ ते १० सेंटीमीटर अंतर ठेऊन लागवड करावी. तर पेरणीसाठी साधारणपणे प्रति हेक्टर ६० ते ७५ किलो बियाणे वापरावे. इतकेच नाही तर शेतकऱ्यांनी पेरणीसाठी एकाच वेळी २ ते ३ सोयाबीनच्या वाणांची लागवड



करावी. असे आवाहनही सोयाबीन संशोधन संस्थेने केले आहे.

शेतकऱ्यांना कसा फायदा होणार : सोयाबीन संशोधन संस्थेच्या वरील सूचनांचे पालन केल्याने शेतकऱ्यांना सोयाबीनचे चांगले उत्पादन मिळू शकते. यामुळे मातीची सुपीकता वाढण्यास मदत होते. याशिवाय पाणी आणि खताचा वापर कार्यक्षमतेने होतो. उत्पादनात होणारा धोका कमी होतो. शेतकऱ्यांना अधिक उत्पन्न मिळू शकते. भारतीय सोयाबीन संशोधन संस्थेने शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की, या सूचनांचे पालन करून सोयाबीनचे चांगले उत्पादन घेऊन देशातील तेलबिया उत्पादनात वाढ होण्यास मदत होणार आहे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८००: कॅनडात जगातील सर्वप्रथम कांजिण्याची लस देण्यात आली.
१८६२: अलेक्झांडर ग्राहम बेल यांनी टेलीफ़ोनचा शोध लावला.
१८९६: गुग्लिएल्मो मार्कोनी यांनी 'रेडिओ'चे पेटंट घेतले.
१८९७: आपल्या मृत्यूचे वृत्त वर्तमानपत्रात वाचून मार्क ट्वेनने न्यूयॉर्क टाईम्सला सांगितले ''माझ्या मृत्यूचे वृत्त ही अतिशयोक्ती आहे''.
१९४६: राजा उंबेर्तो-२ ला हटवून इटलीने राजेशाही संपवली स्वतःला प्रजासत्ताक घोषित केले.
१९४७: भारताची फ़ाळणी करण्याची लॉर्ड मांऊटबॅटन यांची घोषणा.
१९४८: शेतकरी कामगार पक्षाची स्थापना.
१९४९: दक्षिण अफ्रिकेने गोरे सोडुन इतरांना दुय्यम नागरिक ठरवण्याचा कायदा केला.
१९५३: इंग्लंडची राणी दुसरी एलिझाबेथ हिचा राज्यारोहण समारंभ झाला. इंग्लंडच्या राष्ट्रप्रमुखाचा राज्यारोहण समारंभ प्रथमच दूरचित्रवाणीद्वारे जगभर पाहिला गेला.
१९६६: अमेरिकेचे पहिले अंतरीक्ष यान चंद्राच्या पृष्ठभागावर यशस्वीरित्या उतरले.
१९७४: माली या देशाने आपले संविधान स्वीकारले. (१९७४)
१९७९: पोप जॉन पॉल (दुसरे) यांनी (आपल्या मायदेशाला) पोलंडला भेट दिली. कम्युनिस्ट राष्ट्राला भेट देणारे ते पहिलेच पोप होत.
१९९९: भूतानमधे दूरचित्रवाणी प्रसारण सुरू झाले.
२०००: लेखिका व कवयित्री अमृता प्रीतम यांना दिल्ली सरकारचा अकरा लाख रुपयाचा सहस्रकातील कवयित्री हा पुरस्कार जाहीर
२००४: ऑस्ट्रेलियन मॉडेल्स जेनीफर हॉकिन्स यांनी विश्वसुंदरी चा किताब पटकाविला.
२००६: अमेरिकेने आंतरराष्ट्रीय गुन्हेगार दाऊद इब्राहिम आणि त्याच्या संपूर्ण संघटनांवर प्रतिबंध लावला.
२०१४: तेलंगण भारताचे वे२९ राज्य झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७३१: मार्था वॉशिंग्टन अमेरिकेची पहिली 'फर्स्ट लेडी' (मृत्यू: २२ मे १८०२)
१८४०: थॉमस हार्डी इंग्लिश लेखक आणि कवी (मृत्यू: ११ जानेवारी १९२८)
१९०७: मराठी नाटककार आणि लेखक विष्णू विनायक बोकील यांचा जन्म.
१९३०: अमेरिकन अंतराळवीर पीट कॉनराड यांचा जन्म.
१९३०: भारतीय जनता पक्षाचे राजकीय नेता व मध्यप्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री बाबूलाल गौर यांचा जन्मदिन.
१९५१: प्रसिद्ध भारतीय राजकारणी व पंतप्रधान नरेंद मोदी यांच्या मंत्रिमंडळातील माजी केंद्रीय अवजड उद्योग आणि सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे केंद्रीय कॅबिनेट मंत्री तसचं माजी केंद्रीय ऊर्जा व शिवसेना पक्ष सदस्य अनंत गंगाराम गीते यांचा जन्मदिन.
१९४३: इलियाराजा गीतकार आणि संगीतकार
१९५५: नंदन नीलेकणी 'इन्फोसिस'चे सहसंस्थापक
१९५५: चित्रपट दिग्दर्शक मणिरत्नम यांचा जन्म.
१९५६: मणीरत्नम चित्रपट दिग्दर्शक
१९६३: आनंद अभ्यंकर अभिनेते (मृत्यू: २३ डिसेंबर २०१२)
१९६५: मार्क वॉ ऑस्ट्रेलियन क्रिकेटखेळाडू
१९६५: स्टीव्ह वॉ ऑस्ट्रेलियन क्रिकेटखेळाडू
१९७४: गाटा काम्स्की अमेरिकन बुद्धीबळपटू
१९८०: अर्जुन पुरस्कार सन्मानित भारतीय तिरंदाजपटू डोला बॅनर्जी यांचा जन्मदिन.
१९८७: भारतीय चित्रपट अभिनेत्री व गायिका सोनाक्षी सिन्हा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८२: जुसेप्पे गॅरीबाल्डी इटालियन सेनापती व राजकीय नेता (जन्म: ४ जुलै १८०७)
१९७५: देवेन्द्र मोहन बोस वैश्विक किरणांवर मूलभूत संशोधनाची सुरूवात करणारे भारतीय पदार्थवैज्ञानिक (जन्म: २६ नोव्हेंबर १८८५)
१९७८: पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय वैज्ञानिक प्राण कृष्ण पारिजा यांचे निधन.
१९८८: राज कपूर अभिनेता, निर्माता व दिग्दर्शक आणि 'द ग्रेटेस्ट शो मॅन' (जन्म: १४ डिसेंबर १९२४)
१९९०: सर रेक्स हॅरिसन ब्रिटिश आणी अमेरिकन रंगभूमीवरील आणि हॉलिवूड चित्रपटांतील अभिनेते (जन्म: ५ मार्च १९०८)
१९९२: मराठी संस्कृतीचे जर्मन अभ्यासक डॉ. गुंथर सोन्थायमर यांचे निधन. (जन्म: २१ एप्रिल १९३४)
२०१४: भारतीय कार्डिनल दुर्यसामी सायमन लौरडुसामी यांचे निधन. (जन्म: ५ फेब्रुवारी १९२४)

# हिरव्या मिरचीचे सुधारित वाण देतील भरघोस उत्पन्न

खरीप हंगामात मिरची पिकाची लागवड करायच्या विचारात असाल तर जून महिना लागवडीसाठी अगदी योग्य आहे. शिवाय त्यापासून उत्पादन सुद्धा भरघोस मिळते. हिरव्या मिरचीचे सुधारित वाण याची माहिती असने आवश्यक आहे.

पुसा ज्वाला : पुसा ज्वाला ही हिरव्या मिरचीच्या सर्वात प्रगत जातींपैकी एक आहे. मिरचीची ही जात कीड आणि कीटकांना प्रतिरोधक आहे. हिरव्या मिरचीच्या या जातीची लागवड करून शेतकरी सुमारे ३४ क्विंटल प्रति एकर उत्पादन मिळवू शकतात. हिरव्या मिरचीची ही जात पेरणीनंतर सुमारे १३० ते १५० दिवसांत पिकते. मिरचीच्या या जातीचा रंग हलका हिरवा असून त्याची झाडे कमी उंचीची आणि झुडूपासारखी असतात.

जवाहर मिर्च-१४८ : हिरवी जवाहर मिरची-१४८ या सुधारित जातीची जून महिन्यात लागवड करणे शेतकर्यांसाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. या जातीची मिरची सर्वात जलद पिकते आणि तिची चव कमी तिखट असते. मिरचीच्या या जातीच्या हिरव्या मिरचीचे प्रति हेक्टरी उत्पादन ८५ ते १०० क्विंटल एवढे मिळू शकते. जर ही मिरची वाळल्यावर तोडली तर हेक्टरी १८ ते २५ क्विंटल मिरचीचे उत्पादन मिळू शकते.

तेजस्विनी : हिरव्या मिरचीची तेजस्विनी जात जून महिन्यात लागवडीसाठी सर्वोत्तम मानली जाते. हिरव्या मिरचीच्या या जातीच्या शेंगा मध्यम आकाराच्या असतात आणि मिरचीची लांबी सुमारे १० सेंटीमीटरपर्यंत पोहोचते. पेरणीनंतर सुमारे ७० ते ७५ दिवसांनी शेतकरी या प्रकारच्या हिरव्या मिरचीची काढणी करू शकतात. तेजस्विनी जातीच्या हिरवी मिरचीची लागवड केल्यास शेतकर्यांना हेक्टरी २०० ते २५० क्विंटल उत्पादन मिळू शकते. पंजाब रेड : पंजाब रेड वाण ही हिरव्या मिरचीच्या सुधारित जातींपैकी एक आहे. तिच्या झाडाचा आकार लहान आहे आणि तिला गडद हिरवी पाने आहेत. या प्रकारच्या हिरव्या मिरचीचा आकारही फार मोठा नसतो. या जातीची लागवड करून शेतकर्यांना प्रति हेक्टरी १०० ते १२० क्विंटल हिरव्या मिरचीचे उत्पादन मिळू शकते. हिरव्या मिरचीच्या या प्रकारात तुम्हाला लाल रंगाच्या मिरच्या पाहायला मिळतात.

काशी अर्ली : काशी अर्ली या हिरव्या मिरचीच्या जातीपासून शेतकऱ्यांना भरघोस उत्पादन मिळते. या जातीची हिरवी मिरची एक हेक्टर मध्ये सुमारे ३०० ते ३५० क्विंटल उत्पादन देते. या जातीच्या मिरचीचे रोप सुमारे ७० ते ७५ सेमी उंच असून त्यांना लहान गाठी असतात. पेरणीनंतर सुमारे ४५ दिवसांत शेतकरी काशी अर्ली या हिरव्या मिरचीची कापणी करू शकतात.



# मानवलोकच्या तृप्तीतून ५०० ज्येष्ठांना मिष्ठान्न भोजन

## मराठवाड्यात अनेक ज्येष्ठांना एकवेळचे अन्न मिळत नाही; मुले असून देखील आई-बाप निराधार

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केंद्र व राज्य सरकारने भूक बळी जावू नये म्हणून मोफत रेशन दुकानांवर अन्य धान्य पुरवठा केला जात असला तरी मराठवाड्यातील अनेक गावांमध्ये ज्येष्ठ नागरिक एकवेळेच्या अन्नापासून वंचित आहेत. ही हकीकत मानवलोकने जाणून घेतल्यानंतर मराठवाड्यात त्यांच्या केंद्रातर्गत असलेल्या ४१ गावात अशा निराधारांची पाहणी करून त्यांना दोन वेळेचे निष्ठान्य जेवण देण्याची संकल्पना आली. त्यातूनच आज तीन्ही जिल्ह्यामध्ये ५१२ लाभार्थ्यांना दोन वेळेचे निष्ठान्य भोजन मिळत आहे. परंतु मराठवाड्यातील अनेक गावांमध्ये आजही मुले असून देखील आई-वडील निराधार असल्याचे विदारक चित्र पहावयास मिळत आहे.

अंबाजोगाईच्या मानवलोक संस्था संपुर्ण महाराष्ट्रात सेवाभाव हेतुने काम करत असून यात शेतकर्यांना बि-बियाणे दुष्काळी काळात नागरिकांना पिण्याचे पाणी तसेच शेतकर्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध योजना लोकसभागातून या संस्थेने राबविलेले आहेत. या योजनेच्या माध्यमातून अनेक गावातील शेतकरी शेती व्यवसायावर निर्भर झाले आहेत. मानवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया यांनी त्यांचे कार्यक्षेत्र बीड-लातूर-धाराशिव असले तरी त्या गावामध्ये विविध उपक्रम घेवून ते जातात. यावेळी त्या गावातील अडी-अडचणी कशा सोडवाव्या यावर ते विचारमंथन करावे त्या ते तोडगा देखील करतात. शेतकर्यांना सक्षम करण्यासाठी त्यांनी ज्या त्या गावामध्ये विविध योजना अंमलात आणल्या त्या योजना आज फळीत आलेल्या आहेत. शेती व्यवसायाला जोड म्हणून दुग्ध व्यवसायात देखील मानवलोकने शेतकर्यांना मदत केलेली आहे.यातच बहुतांशी गावामध्ये ज्या ज्येष्ठ नागरिकांना मुल-बाळ नाही व त्यांच्याकडे जमिन नाही. अशांची भूक बळी पहावेनाशी झाली. त्यामुळे त्यांनी तृप्ती उपक्रम सुरू केला. या उपक्रमातून मराठवाड्यातील लातूर-धाराशिव-बीड या जिल्ह्यातील ४१ गावांमध्ये ५१२ लाभार्थ्यांना गरजेनूसार निवड करून त्यांना दोन वेळेचे जेवण पुरविण्याचे प्रकल्प हाती घेतला. हा प्रकल्प २०१६ पासुन सुरू असून यातून ज्यांना एकवेळेचे जेवण मिळत नव्हते त्यांना आज दोन वेळेचे भोजन मिळत आहे. मोफत भोजन दिल्यानंतर संबंधीत लाभार्थ्यांना या भोजनाची किंमत कळत नाही त्यामुळे त्यांच्याकडून प्रति महिना दोनशे रूपये आकारला जातो. त्यामुळे अन्य वाटोळे होत नाही.



### भिक्षा मागून जगत होते

बर्दापुर येथील एक निराधार महिला पोटाची खळगी भरविण्यासाठी भिक्षा किंवा भिक मागून उपजिविका भागवत होती. मला मुल-बाळ नाही व जमीन नाही त्यामुळे माझ्या पोटाचा प्रश्न गंभीर बनला होता त्यातच मानवलोकने तृप्ती उपक्रमातर्गत खानावळ सुरू केल्यामुळे मला दोन वेळेचे जेवण घराच्या प्रमाणे मिळत आहे. **-पद्मीनबाई गायकवाड, बर्दापुर**

### जमीन होती ती नवऱ्याने विकली

माझे लग्न झाल्यानंतर आम्हाला मुल-बाळ झालं नाही नवर्याच्या नावाने असलेली चार एक्करची जमीन त्यांनी विक्री केली आता फक्त राहण्यासाठी घर आहे. परंतु अन्य पाण्याचा प्रश्न दुरच आहे. मानवलोकच्या य उपक्रमामुळे आम्हा दोघा नवरा बायकोला दोन वेळेचे अन्य चांगल्या पद्धतीने मिळत आहे.- कांचन रामदास हारे, जवळगाव भजनी मंडळाच्या कार्यक्रमातून मिळालेल्या अन्नातूनच दिवस काढत होतो. जवळगाव येथील मुळ रहिवासी असून माझे लग्न झालेले नाही त्यामुळे मी जातीने कुंभार जातीचा असून माझे हातपाय चालत होते तोपर्यंत मडके बनविण्याचा व्यवसाय केला बदलत्या काळात हा व्यवसाय अडगळीला गेल्यामुळे मी काही करू शकलो नाही. त्यामुळे वयाच्या ५० व्या वर्षापर्यंत पुतण्याकडे व पाहुण्याकडे जावून पोटाची खळगी भरत होतो. वयाची ६५ गाठल्यानंतर सांप्रदायमध्ये घुसलो आणि सांप्रदाय कार्यक्रमातून मला दोन वेळेचे अन्य मिळू लागले परंतु सांप्रदाय कार्यक्रम नेहमी नसायचा त्यामुळे मानवलोकच्या तृप्ती योजनेकडे मी नोंदणी केली व मला दोनवेळेचे अन्य मला मिळत आहे. त्यामुळे मी विवाहीत नसतानाही मी चांगले जीवन जगत आहे. **- शिवाजी भाटनकर, लाभार्थी जवळगाव**

### सर्वेक्षणात आढळले निराधार

मानवलोक संस्था लातूर,बीड, धाराशिव जिल्ह्यात विविध क्षेत्रात काम करत असून या कामाच्या माध्यमातून आपतकालीन संकट भूकंप, दुष्काळी परिस्थिती तसेच शेतकर्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ही संस्था काम करत असताना काहीशा गावांमध्ये अनेक निराधार किंवा मुले-बाळ असून ही आई वडील बेघर असल्याचे आढळून आले त्यामुळे आमच्या संस्थेने निराधारांना दोन वेळेचे अन्य कसे उपलब्ध करता येईल आणि संस्थेच्या पदाधिकार्यांनी याला संमती दिली. त्यानूसार मानवलोक संस्थेने तृप्ती उपक्रम राबवून तिन्ही जिल्ह्यातमध्ये ४१ गावात अशा लाभार्थ्यांचे ५१२ निवड करून त्यांना दोन वेळेचे जेवणाची आम्ही व्यवस्था केली आहे. या निराधारांच्या अन्नाचा प्रश्न मिटल्यामुळे आमची संस्था आजही समाधानी आहे
**- अनिकेत लोहिया, कार्यवाह मानवलोक**

## थोडक्यात



### महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचा ७६ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा

चौसाळा : सर्वसामान्य व्यक्तीला प्रवासात परवडणारी अशी महाराष्ट्र परिवहन मंडळाच्या बस सेवेला एक जून २४ रोजी ७६ वर्षे पूर्ण होऊन ७७ व्या वर्षात पदार्पण होत आहे त्यामुळे सदर महामंडळाच्या बस सेवेच्या वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला वर्धपण दिनानिमित्ताने चौसाळा बस स्थानकात ह भ प लक्ष्मण महाराज माटकर कानडी घाट यांच्या शुभहस्ते बस स्थानकासमोर व पूजन करून शुभारंभ करण्यात आला ह भ प माटकर यांनी सांगितले की एसटीची सेवा ही सर्वसामान्य नागरिकाला परवडणारी आहे सदर सेवा मोफत केल्यामुळे एसटी महामंडळाला त्याने धन्यवाद दिले तर स्थानिक चे पत्रकार एनटी वाघमारे यांनी वयोवृद्ध प्रवाशाने आपल्या योग्य कामासाठी प्रवास करावा विनाकारण प्रवास करू नये असे सुचविले यावर्धन दिनास विक्रम बप्पा सोनवणे मनमत विधाते आत्माराम निनाळे मान्यवर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते चौसाळाचे वाहतूक नियंत्रण कचरू बोबडे यांनी उपस्थित नागरिकाचे स्वागत करून त्यांचे आभार मानले.

### प्रवाशांचे स्वागत करून केला धारूर बसस्थानकात वर्धापन दिन साजरा

धारूरः राज्य परीवहण महामंडळाचा ७६ वा वर्धापण दिन धारूर बसस्थानका वर उत्साहात साजरा करण्यात आला.यावेळी प्रवाशाचे स्वागत करून पेढा भरवून उत्साहात हा वर्धापण दिन साजरा करण्यात आला.बसस्थानकाची व एस टी बस ची सजावट करण्यात आली होती. राज्य परीवहण महामंडळाचा ७६ वा वर्धापन दिना निमित्त धारूर बसस्थानका ची सजावट करण्यात आली होती रांगोळी काढून फुगे लाऊन बस स्थानक सजावट करण्यात आली होती.बसस्थानका वर येणा-या एस टी बस ची सजावट करण्यात आली होती बस मधील वृध्द प्रवाशाना पेढे वाटून त्याना गुलाबाची फुले देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी आगारप्रमुख नवनाथ चवरे , सहायक आगार प्रमुख भारत कोमटवार, सोनवणे, भिक्कड,इब्रान कादरी, अजय सोनटक्के, तिडके, घोळवे, शिवाजी तपसे, गोकुळ जगतापसह कर्मचारी व प्रवाशी मोठ्या संख्येने उपस्थित होते.याव वेळीमोठ्या उत्साहात व आंनदात हा वर्धापण दिन साजरा करण्यास आला



## मनाथ बोरगाव येथे खरीप हंगाम नियोजन कार्यशाळा

### हुमणी नियंत्रणासाठी सामूहिक मोहीम राबवा : शिवप्रसाद येळकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

कृषी विभाग व नॅचरल शुगर यांच्या संयुक्त विद्यमाने सोमनाथ बोरगाव येथे शेतकऱ्यांची कार्यशाळा आयोजित करून सदर कार्यशाळेमध्ये खरीप हंगामाच्या अनुषंगाने मार्गदर्शन करण्यात आले. कृषी सहाय्यक पंडित काकडे यांनी सोयाबीन पिकाची विविध वाण, जैविक बीज प्रक्रियेसाठी महाबीजचे जिवाणू संघ, ट्रायकोडर्मा यांचा सोयाबीन आणि इतर पिकांमधील अन्नद्रव्य आणि रोग व्यवस्थापनासाठीचा वापर बाबत विस्तृत माहिती दिली. कीड रोग व्यवस्थापन तज्ञ शिवप्रसाद येळकर यांनी हुमणी अळीचा जीवनक्रम सांगून व्यवस्थापनासाठी प्रकाश सापळे, एरंड सापळे लावणे तसेच सोयाबीन पिकामधील पिवळा मोझॅक विषाणू आणि सूक्ष्म अन्नद्रव्य कमतरतेमुळे निर्माण होणारा पिवळसरपणा यामधील फरक आणि



याचे व्यवस्थापन तसेच ऊस पिकामधील चाबुक काणी रोग आणि पोंगेमर व्यवस्थापन संदर्भात विस्तृतपणे मार्गदर्शन केले त्याचप्रमाणे बेड तयार करून टोकन पद्धतीने सोयाबीन लागवड करणे आणि शून्य मशागत तंत्रज्ञानाचा अवलंब करणे संदर्भात माहिती दिली. कृषी सहाय्यक राठोड यांनी अनुदानित बियाणे मिळण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज दाखल करण्याबाबत माहिती दिली. कृषी पर्यवेक्षक माचवे यांनी बियाणे उगवण क्षमता व बीज प्रक्रियेचे प्रात्यक्षिक दाखवले. यावेळी सुंदर सोमवंशी, रामदास येडे, सतीश येडे, भगवान पैठणकर, उद्धव संगेकर, सदाशिव राऊत सूर्यभान डोंगरे, हनुमंत सोमवंशी, राजेभाऊ डोंगरे, बाबासाहेब सोमवंशी, रामकिशन बडे, मधुकर शिंदे, ज्योतीराम कानडे, कृष्णा ठोंबरे, दिगंबर सोमवंशी, विठ्ठल शिंदे, श्रीकृष्ण कुरडे, विठ्ठल पवार आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## दाक्षिणात्य नृत्य स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा यश

परळी । प्रतिनिधी

अखिल भारतीय सांस्कृतिक संघ पुणे आयोजित भरत नाट्यम या राष्ट्रीय नृत्य स्पर्धेतकु.शर्वरी बालाजीराव बुरांडे हिने सलग दुसऱ्या वेळेस व्यक्तिगत आणि सांघिक परिवारात प्रथम पारितोषिक पटकावले.विशेष बाब म्हणजे आपला भरत नाट्यम नृत्य कला जोपासत तिने नुकत्याच जाहिरात झालेल्या एस.एस.सी.बोर्ड परीक्षेत ही ९४ टक्के गुण घेत यश संपादन केले.कु.शर्वरी बुरांडे ही परळी येथील निवृत्त बँक अधिकारी गोपाळ तांदळे यांची नात असून हल्ली कु.शर्वरी बुरांडे यांचे कुटूंबीय माजलगाव येथे वास्तव्यास आहेत.



दि३० व दि ३१ मे रोजी पुणे येथील ''अखिल भारतीय सांस्कृतीक संघ पुणे आयोजित भरत नाट्यम नृत्य स्पर्धेत मांजलगाव येथील शिवमुद्रा भरत नाट्यम अकॅडमी नृत्य संस्थेच्या नृत्य शिक्षिका श्रीमती रेखा होके यांचे प्रमुख मार्गदर्शनाखाली कु.शर्वरी बुरांडे हिने सहभाग नोंदविला होता या स्पर्धेत सांघिक व वैयक्तिक असे दोन्ही राष्ट्रीय पातळीवर सलग दुसऱ्यांदा प्रथम क्रमांक मिळविण्याचा मान या हि वर्षी कायम ठेवला आहे.हिशेब बाब म्हणजे कु.शर्वरी हिने नुकत्याच निकाल लागलेल्या एस.एस.सी. २०२४ बोर्ड परीक्षेत ९४.६०,%मार्क मिळवून आपला दक्षिणात्य नृत्याचा आपला छंद कायम जपला आहे.कु.शर्वरी बुरांडे हिच्या आज पर्यंतच्या यशात वडील बालाजी बुरांडे व आई अंजली बुरांडे व नृत्य शिक्षिका श्रीमती रेखा होके व गुरुजनाचे प्रयत्न राहिलेले आहेत.कु.शर्वरी बुरांडे ही परळी शहरातील सेवा निवृत्त बँक अधिकारी गोपाळ तांदळे यांची नात असून बुरांडे कुटूंबीय साध्य माजलगाव येथे कामानिमित्त स्थायिक झाले आहेत.

## लिपीक अरुण वाघमारे यांचा सेवा समाप्ती निमित्त सपत्निक सत्कार

धारुर। प्रतिनिधी

धारूर नगरपरिषदेचे वरिष्ठ लिपिक अरुण लक्ष्मण वाघमारे यांचा सेवा समाप्ती निमित्ताने सपत्निक सत्कार नगरपरिषद धारूर कार्यालयात पार पडला. यावेळी नगराध्यक्ष डॉ स्वरूप सिंह हजारी, लक्ष्मण सीरसट,नितीन शिनगारे आदीच्या उपस्थितीमध्ये सेवानिवृत्ती कार्यक्रम संपन्न झाला.

धारूर येथील नगरपालिका कार्यालयामध्ये अरुण वाघमारे हे १९९२साली लिपिक पदावर रूजू झाले होते.त्यांच्या मनमिळाऊ स्वभावाने नागरीकात लोकप्रिय होते. बत्तीस वर्षे त्यांनी प्रामाणिक सेवा केली. सत्कार सभारंभाच्या वेळी बोलताना मा. नगराध्यक्ष डा.स्वरूपसिंह हजारी यांनी वाघमारे यांनी धारूरकरांना दिलेल्या सेवेचे कौतुक केले. लक्ष्मण सिरसट पत्रकार ईश्वर खामकर यांनीही अरुण वाघमारे यांच्या शुभेच्छा आठवणीना उजाळा दिला केल्या .न.प.कर्मचाऱ्यांनी साडी चोळी



ड्रेस देऊन सपत्निक सत्कार केला यावेळी वाघमारे हे भावनिक झाले होते. या सत्कार समारंभास न.प.धारूरचे मुख्याधिकारी महेश गायकवाड, नगराध्यक्ष डा.स्वरूपसिंह हजारी , माजी नगराध्यक्ष लक्ष्मण सिरसट , राष्ट्रवादी काँग्रेसची नितीन शिनगारे, नगरसेवक बालाजी चव्हाण,बाळासाहेब खामकर,बाळू सिरसट, भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष मोहन भोसले,बिड जिल्हा बँकेचे मनेजर अशोक उजगरे, उद्योजक बिबीषण गायकवाड सादेक बेग ,पत्रकार अतुल शिनगारे,ईश्वर खामकर,विष्णू रंदवे तसेच धारूर नगरपरिषद कार्यालयातील कर्मचारी, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्ह्यात १५ जून रोजी रात्री १२ वाजेपर्यंत मनाई आदेश लागू

बीड। प्रतिनिधी

दि. ४ जून २०२४ रोजी सार्वत्रिक लोकसभा मतजोजणी होणार असल्याने व जिल्हयामध्ये लोकसभा विजयी उमेदवारांच्या मिरवणुका, मोर्चे, उपोषणे धरणे अंदोलने या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी जिल्हादंडाधिकारी दिपा मूधोळ- मुंडे यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहेत.दिनांक २ जून २०२४ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते १५ जून २०२४ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपणास्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे.

पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

## अनाधिकृत होर्डिंग्ज धारकांना सीईओ निता अंधारे यांचा वरदहस्त

### उपायुक्त नगरपरिषद प्रशासन संचनालयाला तक्रार

बीड । प्रतिनिधी

मुंबईच्या घाटकोपर येथील होर्डिंग्ज दुर्घटनेत १७ जणांचा मृत्यू झाल्यानंतर उपायुक्त नगर परिषद प्रशासन संचालनालयाने बीड नगर परिषदेला शहरातील लेखी पत्र पाठवून शहरातील अनाधिकृत होर्डिंग्ज हटविण्याचे संबंधित प्रकरणात कारवाई करण्याचे आदेश दि.१७ मे रोजी दिले होते. अनाधिकृत होर्डिंग्ज २४ तासात हटवण्यात आले नाही तर फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते.मात्र याघटनेला १५ दिवस उलटूनही अद्याप होर्डिंग्ज हटविण्यात आले नसुन कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

मात्र याउलट मुख्याधिकारी निता अंधारेंकडुन अनाधिकृत होर्डिंग्ज धारकांची पाठराखण करण्यात येत असुन कारवाई करण्याऐवजी पालिकेने ते वैध करण्यासाठी खाजगी अभियंत्यांकडुन स्ट्रक्चरल ऑडिट करून घेऊन ते पालिकेकडे जमा करण्यात सांगितले असून त्यासाठी दोन आठवड्यांची मुदत देण्यात आली आहे .त्यामुळे उपायुक्त नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांच्या आदेशाची अवमानना केल्याप्रकरणी जबाबदार मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, प्रधान सचिव, उपायुक्त नगर परिषद प्रशासन संचालनालय मुंबई यांना लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.





### कारवाईचे काय झालं? - डॉ.गणेश ढवळे

घाटकोपर मुंबई येथील होर्डिंग्ज कोसळुन घडलेल्या दुर्दैवी घटनेनंतर त्याची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून बीड शहराच्या कार्यक्षेत्रामध्ये तातडीने याबाबतच्या उपाययोजना करण्यात येत असुन विना परवाना होर्डिंग्ज ,बनर, फलक लावण्यासाठी उभा करण्यात आलेला लोखंडी ढाचा व पोस्टर,बनर फलक २४ तासांच्या आत काढुन घेण्यात यावा नसता मुदतीनंतर आपणा विरोधात रितसर फौजदारी गुन्हा नोंद करून अनाधिकृत होर्डिंग्ज,बनर ,फलक लावण्यासाठी उभा करण्यात आलेला लोखंडी ढाचा व पोस्टर ,फलक काढुन घेण्यात येईल व त्याचा रितसर खर्च आपणाकडून वसुल करण्यात येईल असे पत्रक सीईओ निता अंधारे यांनी काढुन १५ दिवस उलटूनही अद्याप एकावरही कारवाई न झाल्याने फौजदारी कारवाईचं नेमकं घोडं कुठं अडलं असा प्रश्न नागरीकांकडुन विचारला जात आहे.


## जाहिर प्रगटन

**बीड येथील श्रीमती. सुनयना एस. पिंगळे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दि.अर्ज क. ७३८/२०२४**

**दत्तात्रय बन्सी प्रभाळे वि. निरंक ॲड. आर. आर. शिंदे वकील**

अर्जदार :- १. दत्तात्रय पि. बन्सी प्रभाळे, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. पिंपळवाडी, ता.जि. बीड. २. शिवाजी पि. बन्सी प्रभाळे, वय ५९, धंदा शेती, रा. पिंपळवाडी, ता.जि. बीड. ३. कोंडिबा पि. बन्सी प्रभाळे, वय ५६ वर्षे, धंदा शेती, रा. पिंपळवाडी, ता.जि. बीड. ४. इंदुबाई भ्र. बाबासाहेब डफाळ, वय ५४ वर्षे, धंदा घरकाम, रा. उखंडा, ता. पाटोदा, जि. बीड.

**विरूध्द निरंक**

**मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे कायदेशिर वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरीलप्रमाणे अर्ज दाखल केला असून, अर्जदार क. १ ते ३ हे मयत बन्सी जानू प्रभाळे यांचे मुले असून, अर्जदार क्र. ४ ही मयताची विवाहीत मुलगी आहे. मयताचे आई-वडील हे फार पूर्वीच मयत झालेले आहेत. तसेच मयताचे पत्नी नामे पद्मीणबाई भ्र. बन्सी प्रभाळे ही फार वर्षा पूर्वीच मयत झालेली आहे. मयत नामे बन्सी जानू प्रभाळे यांचा मृत्यु दिनांक १५-०४-२०१९ रोजी मौजे पिंपळवाडी, ता. जि. बीड येथे झाला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे बन्सी जानू प्रभाळे, या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहु, मयत नामे बन्सी जानू प्रभाळे रा. पिंपळवाडी, ता. जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताची कायदेशीर वारस म्हणून घोषीत करून अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक २७/०५/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख १३/०६/२०२४** — आदेशावरून

स्वाक्षरित — **क. लिपीक** — शिक्का — स्वाक्षरित — **अधिक्षक** दिवाणी न्यायालय व. स्तर बीड

# यंदा गोपीनाथ गडावर नाही आलात तरी चालेल

## जिथे आहात तिथूनच मुंडे साहेबांचं पुण्यस्मरण करा, फोटोचं पूजन करा, एखादा चांगला संकल्प करा

### लोकनेते मुंडे साहेबांचा ३ जूनला दहावा स्मृतीदिन पंकजाताई मुंडे यांचं राज्यभरातील कार्यकर्त्यांना आवाहन

### लोकसभा मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांची अडचण होऊ नये म्हणून घेतला निर्णय

### ४ जूनला विजयाचा मोठा ध्वज मुंडे साहेबांच्या चरणी अर्पण करण्याचं केलं आवाहन

**परळी वैजनाथ। प्रतिनिधी**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांचा येत्या ३ जून रोजी दहावा स्मृतीदिन असून या पार्श्वभूमीवर भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजाताई मुंडे यांनी राज्यभरातील समस्त कार्यकर्त्यांना यावर्षी गोपीनाथ गडावर न येता जिथे आहात तिथूनच मुंडे साहेबांचं पुण्यस्मरण करा, त्यांच्या फोटोचं पूजन करा, एखादा चांगला संकल्प करा असं आवाहन केलं आहे. ४ जूनला लोकसभेची मतमोजणी असल्याने आपल्या विजयाचा मोठा ध्वज मुंडे साहेबांच्या चरणी अर्पण करा असंही त्यांनी म्हटलं आहे.

यासंदर्भात सोशल मिडियावर एक व्हिडिओ जारी करून पंकजाताई मुंडे यांनी कार्यकर्त्यांना विनंतीवजा आवाहन केलं आहे. पंकजाताईंनी म्हटलं आहे की,दरवर्षी ३ जून हा दिवस येतो तेव्हा आपल्या सगळ्यांना हृदयामध्ये कालवल्यासारखं होतं. मुंडे साहेबांसारखा नेता, आपलं उर्जास्थान, आपलं शक्तीस्थान, आपलं प्रेरणास्थान, आपलं श्रध्दास्थान..आपल्यातून गेले ३ जून यादिवशी..माझा पिता हरवला, तुमचा नेता हरवला. माझ्या पित्यावर, माझ्या नेत्यावर तुम्ही स्वतःच्या पित्यापेक्षाही जास्त प्रेम केलं. आज दहा वर्षे झाली त्यांना जावून पण तरीही तुम्ही न चुकता ३ जूनला गोपीनाथ गडावर येता. यावेळेस एक योगायोग आलेला आहे तो म्हणजे ३ जूनला मुंडे साहेबांची पुण्यतिथी आहे आणि ४ जूनला लोकसभेची काऊंटिंग आहे. त्यामुळे जिल्ह्याच्या ठिकाणी सर्व कार्यकर्ते, काऊंटिंग एजंटला ३ जून रोजी संध्याकाळीच बीडला जावे लागते कारण पहाटे उठूनच त्यांना काऊंटिंगसाठी जावे लागते. मला ही अडचण पूर्णपणे लक्षात आहे. आपली सगळ्यांची इच्छा असून देखील आपल्या सर्वांना यायचं असून देखील ही तळमळ मी समजू शकते. म्हणून मीच तुमची ही अडचण दूर करायचं ठरवलं आहे.



### जिथे आहात तिथूनच पुण्यस्मरण करा

मी आपल्या सर्वांना नम्र विनंती करते की, आपण जिथे आहात तिथूनच मुंडे साहेबांचं पुण्यस्मरण करा. मुंडे साहेबांच्या फोटोचं पूजन करा, एखादा चांगला संकल्प करा आणि आपण यावर्षी गोपीनाथ गडावर नाही आलात तरी चालेल. ४ जूनला मुंडे साहेबांच्या विजयाचा मोठा ध्वज घेऊन मुंडे साहेबांच्या चरणी आपण हा विजय अर्पित करूया. यावेळेस आपण नाही आलात याविषयी मनामध्ये कुठलेही दुःख बाळगू नका. आपण पुढच्या वेळी मुंडे साहेबांच्या पुण्यतिथीनिमित्त खूप चांगले समाजोपयोगी कार्यक्रम करू, त्यावेळी फार मोठया संख्येने आपण उपस्थित रहा. दरवर्षीप्रमाणे आमचं कीर्तन असतं, भोजन असतं ते आम्ही यावर्षी रद्द केलेलं आहे. आपली अडचण टाळावी यासाठी आम्ही हा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्रातील माझ्या समस्त लोकांना विनंती करते की, यावेळेस ३ जूनला आपण कृपया गोपीनाथ गडावर येवू नये. ही विनंती आपण नक्की मान्य कराल आणि माझ्या या विनंतीचा मान राखाल..एवढीच आपल्याकडून अपेक्षा करते.

# तालुक्यात केवळ पाच हजार हेक्टर क्षेत्रातच पेरणी

## ● मृगाकडे डोळे,मशागतीच्या कामास सुरुवात ●

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

तालुक्यात खरिपाचे ७७ हजार हेक्टर पेरणीयोग्य क्षेत्र आहे. त्यापैकी फक्त पाच हजार हेक्टर क्षेत्रावर पेरणी झालेली आहे. तालुक्याचे जून महिन्याचे सरासरी पर्जन्यमान तसे कमीच असते. जुन महिना संपल्या नंतर तालुक्यात पाऊस सुरू होतो हे दर वर्षीचे मोजमाप आहे.

तालुक्यातील गिरवली,धायगुडा पिंपळा, घाटनांदुर व बर्दापूर,पुस,तळणी या परिसरात चांगला पाऊस झाला की शेतकरी पेरणीस सुरुवात करतात. त्यात मुख्यत्वे ज्यांच्याकडे पाणी आहे ते सोयाबीनची टोकण पद्धतीने पेरणी करतात तालुक्यातील चिचखंडी येल्डा, डोंगरपिंपळा या भागात कापसाची लागवड अधिक झालेली दिसते. उर्वरित तालुक्यातील शेतकरी दमदार पावसाची वाट पाहतात.



सर्व शेतकऱ्यांनी जमिनीच्या मशागतीची कामे पूर्ण करून पेरणीसाठी जमीन सज्ज केली आहे. चांगला पाऊस पडताच तिफणीच्या चाड्यावर मुठ धरण्याची गरज आहे. मात्र त्यासाठी पावसाची वाट बघावी लागत आहे.तालुक्यात उसाचे क्षेत्र मोठे असलेला ग्रीन बेल्ट भाग देखील आहे. या भागात तुरळक पाऊस झाला की हा भाग काळ्या जमीनीचा असल्याने तिथे चांगली ओल झाल्याशिवाय पेरणीच होत नाही. शंभर मिलीमीटर पेक्षा जास्त पाऊस झाल्याशिवाय या भागात पेरणीला प्रारंभ होत नाही. त्यामुळे येथील शेतकरी दमदार व जोरदार पावसाच्या प्रतिक्षेत आभाळाकडे टक लावून बसलेले दिसतात.

तालुक्यात बालाघाटाच्या रांगा असलेला भागही २० टक्के भाग आहे. या भागात हलक्या मुरमाड जमीनी असल्याने थोडा पाऊस झाला तरी, पेरण्या होतात. परंतू अलिकडच्या काही वर्षात थोडा थोडका झालेला पाऊस वगळता इथे मोठा पाऊस पडलेला दिसत नाही भागातील साकुडच्या शेतकऱ्यांनी पुरेसा पाऊस झाल्यानंतरच सोयाबीनची पेरणी करावी. जुलैच्या पहिल्या पंधरवड्यापर्यंत सोयाबीनची पेरणी करता येते. त्यामुळे शेतकऱ्यांनी घाबरून न जाता पेरणी योग्य पाऊस झाल्यानंतरच सोयाबीन पेरणी करावी. कमी ओलाव्यावर पेरणी केल्यास बियाणे उगवनीत अडचण येऊ शकते. असे आवाहन तालुका कृषी विभागाने केले आहे.

# लोकनेते सुदंरराव सोळंके साखर कारखान्याचा ऊस तोडणी,वाहतुक करारास प्रारंभ - जयसिंग सोळंके

**माजलगाव । प्रतिनिधी**

ऊस गळीत हंगाम २०२४२५ करिता कार्यक्षम ऊसतोड,वाहतुक यंत्रणा भरती करण्याच्या दृष्टीने करावयाच्या करारास दि.१ जुन २०२४ पासुन प्रारंभ झाला असल्याची माहिती कारखान्याचे व्हा.चेअरमन जयसिंग भैया सोळंके व मुख्य शेतकी अधिकारी आर.आर.देशमुख यांनी दिली.

राज्याचे पहिले उपमुख्यमंत्री स्व.सुंदररावजी सोळंके साहेब यांनी स्थापन केलेल्या व आ.प्रकाश दादा सोळंके व धैर्यशील काका सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वी वाटचाल करत असलेल्या तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा सन २०२३२४ चा ३४ वा ऊस गळीत हंगाम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज करण्याचे काम करण्यात येत आहे.या कारखान्याने



मागील हंगामात ६.४७ लाख मे.टन ऊसाचे गाळप केले.आगामी २०२३२४ गळीत हंगामा करिता कार्यक्षेत्रात गळीतास उपलब्ध ऊस विचारात घेता ६.५० लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दीष्ट निश्चित केलेले असुन, याकरिता कार्यक्षम ऊसतोड,वाहतुक यंत्रणा भरती करावयाचा करारास दि.१०६२०२४ रोजी काखान्याचे व्हा चेअरमन जयसिंह भैया सोळंके आणि संचालक मंडळाच्या प्रमुख उपस्थितीत प्रारंभ झाला.यावेळी कारखान्याचे संचालक भागवत देशमुख, विष्णु निरडे,आबासाहेब गायकवाड, बारीकराव ◀◀ पान ३ वर

# छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त पुरस्कार सोहळा अन्नदान व साड्या वाटपाचा कार्यक्रम संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त शुक्रवार दि.३१मे रोजी जिव्हाळा बेघर केंद्र नवी भाजी मंडई बीड येथे अन्नदान व गरजू महिलांना साडी वाटपाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते बुलंद छावा समाजरत्न पुरस्काराचे वितरीत करण्यात आला.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी वर्ष ९ वे छत्रपती संभाजी महाराज जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यावर्षी नवी भाजी मंडई बीड येथील जिव्हाळा बेघर केंद्रामध्ये कार्यक्रम आयोजित करण्यात आला या



**बुलंद छावा पुरस्काराने घोलप, सुखवसे,उगले सन्मानित**

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेनेचे जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे, तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष बापूसाहेब साळुंके, गणेश नाईकवाडे, राष्ट्रीय छावाचे जिल्हाध्यक्ष युवराज मस्के, भ्रष्टाचार निर्मूलन समिती जिल्हाध्यक्ष गणेश नाईकवाडे, संभाजी सेनेचे जिल्हाध्यक्ष भरत वालेकर दै. झुंजार नेता चे पत्रकार बळीराम भोसले ॲड. दिनेश नाटकर आदी उपस्थित होते. छत्रपती शंभूराजे जयंतीनिमित्त यावर्षीचा बुलंद छावाचा पुरस्कार ॲड. संतोष घोलप, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते अशोक सुखवसे शिव व्याख्यानकार आर आर उगले यांना प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रमात पुरस्कार वितरित करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन बुलंद छावा चे जिल्हाध्यक्ष विठ्ठल बहीर यांनी केले बुलंद छावाचे पदाधिकारी नारायण गवते आजिनाथ आदमाने, जीवन धांडे, विजय पवार यांनी परिश्रम घेतले . या कार्यक्रमात शंभू प्रेमी उपस्थित होते.

# रमेश आडसकर यांच्या वाढदिवसानिमित्त किराणा किट सह रुग्णांना फळ वाटप करुन वाढदिवस केला साजरा

**केज । प्रतिनिधी**

सध्या वाढदिवस म्हटले की मोठ मोठे बॅनर बाजी करणे केक तोफा फटाके या गोष्टीवर प्रचंड प्रमाणात व्यर्थ पैसा खर्च होतो त्याला फाटा देत आंबा साखर कारखान्याचे संचालक मिनाज पठाण यांनी गोरगरीब जनतेसोबत आपले नेते रमेशरावजी आडसकर यांचा वाढदिवस साजरी केला

केज , माजलगाव मतदार संघाचे भाजपाचे नेते रमेशराव आडसकर यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालय केज येथे रुग्णांना केळी, सफरचंद,पाणी बॉटल व पालावरील हतावर पोट असणाऱ्या गोरगरीबांना किरणा किटचे वाटप



करून लाडक्या नेत्याचा वाढदिवस, सोनिजवळा येथील अंबा साखर कारखान्याचे संचालक तथा ग्रामपंचायत सदस्य मिनाज पठाण यांनी रमेशराव आडसकर यांचा वाढदिवस साजरा केला.

या बाबत सविस्तर वृत्त असे की माजलगाव मतदार संघाचे नेते रमेश आडसकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ग्रामीण रुग्णालय केज येथील रुग्णांना फळ व पालावरील लोकांना किराणा किटचे वाटप करण्यात आले या वेळी केज ग्रामीण रुग्णालयाचे अधीक्षक डॉ केंद्र सर, डॉ , इंगोले सर, डॉ नागरगोजे सर, पत्रकार दशरथ चवरे, रमेश गुळभिले, रामदास तपसे , धनंजय कुलकर्णी, रंजित घाडगे, मुबशीर खतीब,सनी शेख, ग्रामपंचायत सदस्य देवीदास जोगदंड, सेवा सहकारी सोसायटी चे व्हाइस चेअरमन, हुसेन पटेल, आसेफ पठाण, व ईतर उपस्थित होते तर या कार्यक्रमाचे आयोजन मिनाज पठाण यांनी केले होते तर आभार देविदास जोगदंड यांनी केले.

मिनाज पठाण यांनी बोलताना सांगितले की मला गोरगरीब हातावरचे पोट असणारे मोलमजुरी करून आपला उदरनिर्वाह चालवणारे , तसेच उपजिल्हा ◀◀ पान ३ वर

## दहावीच्या परीक्षेत श्रद्धा घोरडचे घवघवीत यश

**गेवराई । प्रतिनिधी**



तालुक्यातील कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी कु. घोरड श्रद्धा रामदास हिने शालांत प्रमाणपत्र परीक्षेत ९३.६०% गुण मिळून घवघवीत यश मिळविले आहे. शालांत प्रमाणपत्र परीक्षेचा निकाल जाहीर झाला असून कु. घोरड श्रद्धा रामदास या विद्यार्थिनींने मराठी विषयात -९२ हिंदी -८९ इंग्रजी -९४ गणित -८४ विज्ञान- ९४ सामाजिक शास्त्र -८४ असे एकूण ५०० पैकी ४६८ गुण मिळवून घवघवीत यश संपादन केल्याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# खत आणि बियाणे यांची साठेबाजी करून शेतकऱ्यांची लूट कराल तर याद राखा :- शिवसंग्रामचा इशारा

**कडा । प्रतिनिधी**

आगामी काळात खरीप हंगामात आष्टी तालुक्यात आणि परिसरात बी -बियाणे आणि खते यांचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून जादा दराने बियाणे आणि खतांची विक्री केली जात असते हे तात्काळ थांबले पाहिजे.शेतकऱ्यांना योग्य दरात आणि त्यांना हवेत त्या प्रमाणात बियाणे आणि खते उपलब्ध करून द्यावीत,अशी मागणी प्रसिद्धी प्रसिद्दी पत्रकाद्वारे शिवसंग्राम चे तालुकाध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांनी केली आहे .



सध्या लवकरच महाराष्ट्रात मान्सून दाखल होणार आहे असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे त्याच पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेतकरी पेरणीसाठी धावपळ करत असतात याचा फायदा घेऊन अनेक कृषी सेवा केंद्रातून शेतकऱ्यांची लुबाडणूक होत करून जुन्या खताचा साठा असतानाही तो साठा न दाखवता वाढीव दराने सर्रास खत विक्री केली जात असते. खरिपाच्या पेरणीसाठी आवश्यक असलेल्या बियाणांसाठी ही शेतकऱ्यांना ताटकळत ठेऊन बाजारात खतांची आणि बियाण्यांची कृत्रिम टंचाई निर्माण केली जाऊ शकते. या बाबीकडे महसूल प्रशासन आणि कृषी खात्याने गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे आहे.अनेक कृषी सेवा केंद्रामध्ये शेतकरी आणि विक्रेते यांच्यामध्ये वाद होत असतात. हे थांबले पाहिजेत.शेतकऱ्यांना न्याय मिळाला पाहिजे.अशी मागणी चौधरी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे

एकीकडे दुष्काळ जन्य परिस्थितीमुळे, पिकांना योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी अगोदरच अडचणीत सापडला आहे. त्याचे जीवन विस्कळीत झाले आहे.असे असताना या जगाचा पोशिंद्यालाच लुबाडण्याचे पाप व्यापारी करत असतात.शेतकऱ्यांना हव्या असलेल्या खतांच्या ऐवजी इतर खतांची विक्री करण्यासाठी कृषी केंद्र व व्यापारी आग्रही आसतात. तसेच शेतकऱ्यांना हव्या असलेल्या ◀◀ पान ३ वर

# पत्रकार संघाचे नवनिर्वाचित पदाधिकारी व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**गेवराई । प्रतिनिधी**

श्री जगदंबा ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था गेवराई व ग्राहक पंचायत महाराष्ट्र शाखा गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ३० मे रोजी ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र गेवराई येथे अंकुशराव आतकरे यांचा गेवराई तालुका अध्यक्षपदी व अनिल आगुंडे यांची कार्याध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल यथोचित सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर इतर पदाधिकारी पत्रकार यांचा सत्कार संपन्न झाला. यावेळी बहुसंख्य नागरिक कार्यक्रमास उपस्थित होते तसेच सेवाभावी संस्थेचे पदाधिकारी व ग्राहक पंचायत चे पदाधिकारी याप्रसंगी उपस्थित होते.



दहावी बोर्ड परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.गेवराई तालुक्यातील मनमिळाऊ स्वभावाचे सर्व पत्रकारांना व सर्व सेवाभावी संस्थेला मार्गदर्शन वेळोवेळी त्यांच्या होणाऱ्या अडीअडचणी व पत्रकार मंडळीच्या अडीअडचणीसाठी सदैव उपलब्ध असणारे व सर्वांना मदत करणारे अंकुशराव आतकरे हे सलग बारा वर्षे पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी निवड असल्यामुळे सर्वांना आनंद द्विगुणीत होत आहे. याप्रसंगी अंकुशराव आतकरे, सुनील मुंडे, अनिल आगुंडे, शिवनाथ काळे इत्यादी पत्रकार यावेळी उपस्थित होते. अनिल बोर्डे यांनी वरील मान्यवराचे स्वागत ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुणे-नाशिक औद्योगिक द्रुतगतीवर हरकती; वाढीव बाजारभाव देण्याची मागणी

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे-नाशिक औद्योगिक द्रुतगती महामार्गाला लोणी (ता. आंबेगाव) येथील शेतकर्यांनी ग्रामसभा घेऊन हरकती घेतल्या आहेत. लोणी गावच्या २०० शेतकर्यांच्या शेतीमधून हा महामार्ग जात असल्याने बरेचसे शेतकरी भूमिहीन होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकर्यांनी ग्रामसभा घेत या महामार्गावर हरकती नोंदवून संपादित जमिनींना वाढीव दराने मोबदला देण्यासह विविध मागण्यांचे ठराव करण्यात आले.



ग्रामसभेमध्ये सरपंच डॉ. सावळाभाऊ नाईक, ज्येष्ठ कार्यकर्ते बाळासाहेब वाळुंज, माजी सरपंच उद्धराव लंके, माजी सरपंच दिलीप वाळुंज, कैलासराव गायकवाड, पोलिस पाटील संदीप आढाव, उपसरपंच प्रकाश गायकवाड, विजय खंडागळे, प्रकाश शिनलकर, सोसायटीचे अध्यक्ष उत्तम आदक, माजी उपसरपंच दिलीप आदक, ग्रामविकास अधिकारी अनिल टेमकर आदींसह ग्रामस्थ आणि महिला उपस्थित होत्या. लोणी येथील बाधित शेतकर्यांच्या शिष्टमंडळाने सरपंच डॉ. सावळाभाऊ नाईक यांच्या नेतृत्वाखाली नुकतीच पुणे विभागाच्या महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाच्या कार्यकारी अभियंता अश्विनी घोडके तसेच भूसंपादनाचे उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे यांची भेट घेत शेतकर्यांच्या अडीअडचणी मांडल्या होत्या.

तसेच, आंबेगाव-जुन्नरचे उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे यांच्याकडेही बाधित शेतकर्यांना हरकती नोंदविण्यास मुदतवाढ द्यावी, अशी मागणी केली होती. त्या पार्श्वभूमीवर लोणी गावात ग्रामसभा झाली. या ग्रामसभेमध्ये जमिनीचा बाजारभाव वाढवून द्यावा, प्रतिगुंठा दहा लाख रुपये बाजारभाव मिळावा, महामार्गाचा आराखडा दाखवावा, पर्यायी जमीन मिळावी, सरकारने समिती नेमून बाजारभावाची सत्य परिस्थिती जाणून घ्यावी, बाधित शेतकर्यांच्या मुलांना खासगी किंवा सरकारी कंपन्यांमध्ये नोकरी मिळावी, रस्त्यालगत बाधित शेतकर्यांना व्यवसायास परवानगी द्यावी, तसेच शेतकर्यांना हरकती घेण्यास मुदत वाढवून द्यावी आदी मागण्यांचे ठराव करण्यात आले. त्याप्रमाणे शेतकर्यांनी हरकत अर्ज तयार केले आहेत.

**समृद्धी महामार्गाप्रमाणे मोबदला द्यावा**

तसेच मुंबई-गोवा महामार्ग व समृद्धी महामार्गाप्रमाणे शेतकर्यांना जास्तीत जास्त बाजारभाव (भरपाई) मिळावा, अशी मागणी लोणीचे सरपंच डॉ. सावळाभाऊ नाईक यांनी केली. खासदार, आमदार व राजकीय पदाधिकार्यांनी शेतकर्यांच्या हितासाठी या प्रश्नाचा पाठपुरावा करावा, अशी मागणी ज्येष्ठ कार्यकर्ते बाळासाहेब वाळुंज यांनी केली आहे.

# अल्पवयीन मुलीने पिकअपने युवकाला चिरडले

**शिक्रापूर । प्रतिनिधी**

पुण्यातील कल्याणीनगर भागातील पोर्शे कार अपघात प्रकरण चर्चेत असतानाच शिरूर तालुक्यातील आरणगाव येथे आणखी एक दुर्घटना घडली. येथील पोलिस पाटलाच्या अल्पवयीन मुलीने पिकअप चालवत असताना मोटारसायकलला समोरून जोरदार धडक देत सुमारे ३० फूट मागच्या चाकाखाली फरपटत नेल्याने अरुण विठ्ठल मेमाणे (वय ३०) याचा मृत्यू झाला, तर महेंद्र रावसाहेब बांडे दोघेही (रा. वडगाव बांडे, ता. दौंड) हे गंभीर जखमी झाले.







शुक्रवारी (दिं. ३१ मे) सकाळी सव्वादहाच्या सुमारास मयत अरुण विठ्ठल मेमाणे व त्याचा मित्र महिंद्र बांडे असे दोघे सप्लेंडर मोटार सायकलने (एमएच १२ एसएफ ३४३९) डिपीचे ऑइल आणण्यासाठी वडगावबांडे येथुन न्हावरे येथे जात होते. या वेळी अरणगावातील पिकअप (एमएच १२ एसएफ ३४३९) यावरील अल्पवयीन चालकाने समोरुन ठोस देवुन मोटार सायकलसह चालकास २० ते ३० फुट फरफटत नेल्याने अपघातात अरुण विठ्ठल मेमाणे व त्याचा मित्र महिंद्र रावसाहेब बांडे जखमी झाले. फोनवर माहिती मिळताच घरातील नातेवाईकांनी तेथे ठिकाणी जावुन पाहणी केली असता अपघातग्रस्त पिकअप अरुण मेमाणे यांच्या अंगावर गेलेला होता व सोबत त्याची मोटार सायकल देखील पिकअपच्या खाली पडलेली होती.

पिकअपचे बाजुला महिंद्र बांडे हा जखमी अवस्थेत असल्याने जमलेल्या लोकांनी तातडीने अरुण व त्याचा मित्र महेंद्र बांडे या दोघांनाही शिरुर येथील दवाखान्यात हलविले. परंतु उपचारापुर्वीच अरुण मेमाने याचा मृत्यू झाला असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. अरणगाव (ता. शिरूर)चे पोलीस पाटील संतोष निवृत्ती लेंडे यांनी त्यांच्या १५ वर्ष अल्पवयीन मुलीला त्यांचे मालकीचे पिकअप चालवण्यास दिले व ते स्वतः बाजुला बसले होते. या अपघातानंतर खबर न देता ते तेथुन निघुन गेले. याप्रकरणी पोलिस पाटील संतोष निवृत्ती लेंडे व अल्पवयीन मुलगी यांच्यावर गुन्हा दखल करण्यात आला आहे. या अपघात प्रकरणी मयत युवकाचा भाऊ सतीश विठ्ठल मेमाणे यांनी शिक्रापूर पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली.

# येडगाव धरणातून २० दिवसांचे आवर्तन सुरू : पाच तालुक्यांना फायदा

**नारायणगाव । प्रतिनिधी**

कुकडी प्रकल्पाच्या येडगाव धरणाच्या डावा कालव्यातून १४०० क्युसेकने

पुणे, नगर, सोलापूर या जिल्ह्यांतील करमाळा, कर्जत, श्रीगोंदा, पारनेर आणि जुन्नर या पाच तालुक्यांसाठी २० दिवसांचे आवर्तन ३० मेपासून सुरू करण्यात आल्याची माहिती जलसंपदा विभागाच्या नारायणगाव कार्यालयाचे कार्यकारी अभियंता प्रशांत कडूसकर यांनी दिली. दरम्यान, या कालव्यातून कुकडी नदीपात्रात देखील पाणी सोडण्यात आले आहे. त्यामुळे पिंपळवंडी, वडगाव, कांदळी, साळवाडी, बोरी, साकोरी, निमगाव सावा व त्यापुढील कुकडी नदीकाठच्या शेतकर्यांना या पाण्याचा उपयोग होणार आहे.



पिंपळगाव जोगा धरणातील मृतसाठ्यातील पाणी येडगाव धरणात आणल्याने या धरणाची पाणीपातळी ५५ टक्के झाली आहे. कुकडी प्रकल्पातील पाणीसाठा झपाट्याने कमी झाल्यामुळे शेतकरी चिंता व्यक्त करीत आहे. वेळेवर पाऊस झाला नाही, तर शेतपिकाबरोबरच पिण्याच्या पाण्याची मोठी गैरसोय होऊ शकते, अशी भीती व्यक्त होत आहे. वडज व माणिकडोह धरणांत पाण्याचा साठा खूपच कमी असल्यामुळे परिसरातील पाणीपुरवठा योजना बंद पडू लागल्या आहेत. तसेच, आदिवासी लोकांना पिण्याच्या पाण्यासह जनावरांना पाणी उपलब्ध होत नसल्यामुळे त्यांची मोठी कुचंबणा होत आहे.

# पाण्यासाठी डाळजला पुणे-सोलापूर महामार्ग रोखला

**इंदापूर । प्रतिनिधी**

इंदापूर तालुक्याला पिण्याच्या व जनावरांच्या पाण्यासाठी खडकवासला कालव्याचे आवर्तन मिळावे, या मागणीसाठी खडकवासला कालवा संघर्ष समिती कळसच्या वतीने शुक्रवारी (दि. ३१) सकाळी ११ वाजता डाळज क्रमांक २ येथे पुणे-सोलापूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. या वेळी कार्यकारी अभियंत्यांच्या पाणी सोडण्याबाबतच्या आश्वासनाशिवाय रस्त्यावरून उठणार नसल्याची भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतल्यानंतर कार्यकारी अभियंत्या श्वेता कुर्हाडे आंदोलनस्थळी दाखल झाल्या. मात्र, त्यांच्याकडूनही समाधानकारक उत्तर न मिळाल्याने आंदोलक आंदोलनावर ठाम राहिले. हे आंदोलन सुमारे २ तास सुरूच होते.



खडकवासला कालव्याच्या लाभक्षेत्रातील कळस, रुई, न्हावी, निरगुडे, भादलवाडी, अकोले आदी गावांतील लाभधारक शेकडो ग्रामस्थ या आंदोलनात सहभागी झाले होते. महामार्गावर रखरखत्या उन्हात चटके सहन करत 'पाणी आमच्या हक्काचं नाही कोणाच्या बापाचं'च्या घोषणा देत आंदोलनकर्त्यांनी संतप्त भावना व्यक्त केल्या. या वेळी संघर्ष समितीच्या सदस्यांची भाषणे झाली. यामध्ये खडकवासला कालव्याच्या पाण्याबाबत इंदापूर तालुक्यावर वारंवार अन्याय केला जात असल्याची भावना व्यक्त केली. प्रकल्प सिंचन आराखड्यात मंजूर क्षेत्रापैकी प्रत्यक्ष सिंचित होणारे क्षेत्राचे प्रमाण ८ टक्क्यांवर आले असून, दिवसेंदिवस कालव्याचे पाणी कमी होत चालले आहे. कालव्याच्या हक्काच्या पाण्यासाठी ग्रामस्थांना रस्त्यावर येण्याची वेळ आल्याची बाबही खेदजनक असल्याची प्रतिक्रिया उपस्थित आंदोलनकर्त्यांनी या वेळी व्यक्त केली.

दरम्यान, प्रभारी उपविभागीय अभियंता श्यामराव भोसले यांनी आंदोलनस्थळी भेट दिली. या वेळी आंदोलनकर्त्यांनी त्यांना पाणी सोडण्याचे आश्वासन देणार आहात का, असा सवाल केला. यावर त्यांनी तो विषय माझ्या अधिकारात नसल्याचे सांगितले. यावर कार्यकारी अभियंता आल्याशिवाय रस्त्यावरून न उठण्याचा पवित्रा आंदोलनकर्त्यांनी घेतला. यानंतर आलेल्या कार्यकारी अभियंता श्वेता कुर्हाडे यांनी आंदोलनकर्त्यांना शांत राहण्याचे आवाहन करत इंदापूरला पाणी सोडण्याबाबत पाटबंधारे विभागाची सकारात्मक भूमिका आहे असे सांगितले. याबाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी पाठविण्यात आला असून, त्यास पाच-सहा दिवसांत मंजूरी मिळेल. याशिवाय पाणी सोडता येणार नसल्याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले. यावर 'आम्ही पिण्यासाठी पाणी मागत आहोत. त्यामुळे पाणी सोडण्याचा निर्णय आत्ताच जाहीर करा. नुसते प्रयत्न नकोत पाणी द्या,' अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली.

या आंदोलनात प्रतापराव पाटील, खडकवासला कालवा संघर्ष कृती समितीचे अध्यक्ष विजय गावडे, रमेश खारतोडे, बाळासाहेब भांडवलकर, भगवान खारतोडे, माउली कन्हेरकर, दत्तात्रय दराडे, विनोद पोंदकुले, दादासाहेब खारतोडे, अनिल खारतोडे, विशाल राजेभोसले, राहुल खारतोडे, पिंटू खारतोडे, जनार्दन पांढरमिसे, निवृत्ती गायकवाड आदी उपस्थित होते. भिगवण पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक विनोद महांगडे यांनी बंदोबस्त ठेवला होता, तर महामार्ग पोलिस केंद्राचे पोलिस उपनिरिक्षक महेश कुरेवाड यांनी सहकार्यांसह वाहतुकीचे नियोजन केले.



**पिंपरी :** पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट असोसिएशनच्या वतीने वकील बार रूम मध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून जयंती साजरी करण्यात आली. या वेळी अध्यक्षा ॲड.प्रमिला गाडे, माजी अध्यक्ष ॲड.नारायण (नाना) रसाळ, ॲड.सुनिल कडूसकर, ॲड.जे.के.काळभोर (काका), ॲड.गायकवाड, ॲड.अरुण (मामा) खरात, ॲड.बी.के कांबळे, ॲड.अधिक चरेगावकर,ॲड. राजेश रणपिसे, ॲड.रुपाली पवार, ॲड.अंजली सावंत, ॲड. गुंजाळ, ॲड. सुरेखा शेख इ.वकील मान्यवरांनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याचे स्मरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन पिंपरी चिंचवड ॲडव्होकेट असोसिएशनच्या अध्यक्षा ॲड.प्रमिला गाडे, उपाध्यक्ष ॲड.गोरख कुंभार, महिला सचिव ॲड.वर्षा तिडके, खजिनदार ॲड.ऐश्वर्या शिरसाठ ॲड.जयेश वाकचौरे, ॲड.तेजश चवरे, ॲड.विशाल पौळ यांच्याकडून करण्यात आले.

# जुने वाडा गाव पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी; धरणातील पाणीसाठा घटला

**पुणे । प्रतिनिधी**

खेड तालुक्याची आर्थिक राजधानी म्हणून ओळखले जाणारे जुने वाडा गाव अनेकांच्या आठवणींना आजही तितकाच उजाळा देते. चासकमान धरणाच्या पाण्यात लुप्त झालेले जुने वाडा गाव धरणाची पाणीपातळी घटल्याने दृष्टिक्षेपात आले असून, अनेकांच्या आठवणी उजळल्या आहेत. वाडा व परिसरातील तसेच गावातील विस्थापित झालेले नागरिक आजही आपल्या आठवणी साठवण्याकरिता जुन्या वाडा गावाला मोठ्या प्रमाणात भेटी देत आपल्या पिढीला आठवणी सांगत आहेत. चासकामन धरणाच्या बांधकामास १९७८ साली सुरुवात झाली. त्यानंतर जुने वाडा गाव विस्थापित होण्यास सुरुवात झाली. अनेक जण बाहेरगावी गेले, तर काही जवळच नवीन वाडा गावात प्रस्थापित झाले. तेथे स्थायिक झाले.

चासकमान धरणात १९९४ साली पाणी अडविण्यास सुरुवात झाल्यानंतर जुने वाडा गाव पाण्यात लुप्त झाले. जुने वाडा गाव हे पश्चिम भागातील सर्वांत मोठे म्हणजेच पश्चिम भागाची आर्थकि राजधानी होती. राजगुरुनगरपासून २८ किमी अंतरावरील वाडा हे राजकीयदृष्ट्या महत्त्वाचे गाव होते. पश्चिम भागातील ५१ गावे व अनेक वाड्या-वस्त्यांसाठी गावात मोठी



बाजारपेठ होती. अनेक किरकोळ तसेच मोठे व्यापारी होते. अनेक दूध संस्था होत्या. गावातील रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयात अनेक गोरगरीब विद्यार्थ्यांचे आयुष्य घडले. सध्या धरणातील पाणीसाठा कमी झाल्याने ३० वर्षांनंतरच्या जुन्या आठवणी ताज्या झाल्या. गावातील भव्य पुरातन दगडी बांधकामातील श्रीशिव महादेवाचे मंदिर आजही सुस्थितीत आहे.

बाजारपेठेचे अवशेष तसेच धर्मराज मंदिर, श्रीमारुती मंदिर, श्रीविठ्ठल-रखुमाई मंदिर, श्रीशनी मंदिर, श्रीराम मंदिर, श्रीलक्ष्मी-नारायण मंदिर, श्रीगणपती मंदिर, श्रीदत्त मंदिर आदी मंदिरे पाण्याबाहेर आली आहेत. मात्र, पश्चिम भागातील गावांना जोडला जाणारा पूल मात्र दिसत नाही. या धरणाच्या पाण्यात वाडा, कोयाळी, कहू, बिबी, तिफनवाडी, माझगाव या गावांचा बळी गेला. अनेकांच्या संसाराची बसलेली घडी क्षणात विस्कटली. वडिलोपार्जित जमीन या धरणाच्या पाण्यात गेली. या ठिकाणी अनेक शासकीय कार्यालये, महाविद्यालये, शाळा, वसतिगृह, हॉटेल, राईस मिल अशा अनेक सोयीसुविधायुक्त जुन्या वाडा गावच्या आठवणी अजूनही अनेकांच्या डोळ्यात पाहायला मिळत आहेत. आजही नागरिक मोठ्या संख्येने येथे येत असून, जुन्या आठवणींनी अनेकांचे डोळे पाणावलेले पाहायला मिळतात.

# खा. सुप्रिया सुळेंकडून भिकुले कुटुंबीयांचे सांत्वन

**नसरापूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद कृषी व पशुसंवर्धनचे माजी सभापती अण्णासाहेब भिकुले यांचे नुकतेच वृद्धापकाळाने निधन झाले. खासदार सुप्रिया सुळे यांनी त्यांच्या घरी भेट देऊन भिकुले यांना श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन केले.



भिकुले यांच्या खोपी (ता. भोर) येथे जाऊन खासदार सुळे यांनी त्यांच्या कुटुंबाची भेट घेतली. तसेच भिकुले यांच्या पत्नीसह संपूर्ण कुटुंबीयांचे सांत्वन केले. या वेळी माजी उपसभापती मानसिंग धुमाळ, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे भोर तालुकाध्यक्ष रवींद्र बांदल, युवकचे अध्यक्ष गणेश खुटवड, दादा डिंबळे, माऊली डिंबळे, माजी सरपंच कृष्णा शिवरकर, सरपंच तुषार कांबळे, उपसरपंच सनी शिवरकर, दत्तात्रय पवार, पोलिस पाटील तृप्ती कांबळे, तंटामुक्ती अध्यक्ष सुनील मारणे, सचिन कांबळे आदी उपस्थित होते.

दरम्यान, अण्णासाहेब भिकुले यांच्या निधनानंतर अनेक राजकीय नेतेमंडळी त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या कुटुंबीयाची विचारपूस करत आहेत. अण्णासाहेब भिकुले एकेकाळचे शरद पवार यांचे सहकारी होते. जुन्या काळातील पवार यांच्यासमवेत विविध कार्यक्रमातील फोटो भिकुले यांचे पुत्र कृष्णा, अशोक व अनिल यांनी खासदार सुळे यांना दाखवले. तर नुकतेच लोकसभा निवडणुकीत सुळे यांच्या प्रचारासाठी कापूरहोळच्या सभेत अण्णासाहेब भिकुले उपस्थित होते. या आठवणींना उजाळा मिळताच खासदार सुप्रिया सुळे या भावूक झाल्या होत्या

# डेक्कन क्वीनचा वाढदिवस जल्लोषात साजरा

**पुणे । प्रतिनिधी**

विविध प्रकारची रंगबेरंगी फुगे झेंडूच्या फुलांच्या माळा वेळ सकाळी सातची इतक्यात जोरदार भोंगा वाजला. आणि मेगा ब्लॉकमुळे रद्द असतानाही डेक्कन क्वीन यार्डतून केक कापण्यासाठी पुणे रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्मवर आली. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते केक कापून डेक्कन क्वीनचा वाढदिवस जल्लोषात साजरा करण्यात आला.





पुणे रेल्वे स्थानकावरून मुंबईला जाणार्या चाकरमान्यांना दररोज घेऊन जाणार्या आणि पुण्यात आणणार्या डेक्कन क्वीन रेल्वे गाडीचा शनिवारी (दि.०१) ९५वा वाढदिवस साजरा करण्यात आला. रेल्वे प्रवासी ग्रुपच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही पुणे रेल्वे स्थानकावर वाढदिवस मोठ्या जल्लोषात साजरा झाला. यावेळी बाबा मगर, रेल्वे प्रवासी ग्रुपच्या अध्यक्षा हर्षा शहा, मध्य रेल्वे पुणे विभागाचे जनसंपर्क अधिकारी रामपाल बडपग्गा, व अन्य प्रवासी वर्ग उपस्थित होता. शनिवारी वाढदिवस साजरा करण्यासाठी डेक्कन क्वीन रद्द असतानाही यार्डातून प्लॅटफॉर्म क्रमांक चारवर वाढदिवस साजरा करण्यासाठी आली याकरता रेल्वेच्या विभागीय व्यवस्थापक इंदू दुबे यांनी विशेष सहकार्य केले.

रेल्वे प्रवासी ग्रुपच्या अध्यक्षा हर्षा शाह म्हणाल्या, दि ग्रेट इंडिया पॅनासुलर रेल्वे (जीआयटीआर) यांनी दिनांक १ जून १९३० रोजी 'पुणे-मुंबई-पुणे' या मार्गावर ईलेक्ट्रिक, हायस्पीड, कंफर्ट, लक्झरी, डिलक्स सुविधांनी परिपुर्ण अशी 'डेक्कन क्वीन' ही रेल्वे गाडी सुरू केली. ती आता मध्य रेल्वे अंतर्गत सुरू आहे. ही जगातील एकमेव ट्रेन आहे, जिचा वाढदिवस साजरा होत असतो. गेल्या अनेक वर्षांपासून म्हणजेच अगदी मी पाच वर्षाची असल्यापासून वाढदिवस साजरा करते. डेक्कन क्वीन चा वाढदिवस हा माझ्यासाठी जिव्हाळ्याचा विषय आहे.

# कलेतून खेळकर वृत्ती प्रतित व्हावी-शिवराज गोर्ले

## कै. मधुकर टिल्लू स्मृती दिनानिमित्त एकपात्री कला प्रसार दिन सोहळा
## सुबोध चितळे यांचा 'आर्टिस्ट ऑफ द इयर' पुरस्काराने गौरव

**पुणे । प्रतिनिधी**

अभिव्यक्तीत संवाद, आशय महत्त्वाचा असला पाहिजे. अभिव्यक्तीतून भरभरून जगणे, खेळकर वृत्ती प्रतित झाली पाहिजे. संवादासाठी भाषा आवश्यक असते. साहित्य, कलेच्या प्रांतात निर्मितीला महत्त्व असते. एकपात्री कलेच्या क्षेत्रात यश मिळाल्यानंतर थांबू नका. तुमच्यात कल्पनाशक्ती असल्याने लिहितेही व्हा, असा सल्ला प्रथितयश लेखक शिवराज गोर्ले यांनी दिला.

एकपात्री कलाकार परिषद, महाराष्ट्र आणि निळू फुले कला अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ एकपात्री कलाकार कै. मधुकर टिल्लू स्मृती दिनानिमित्त शनिवारी (दि. १) एकपात्री कला प्रसार दिन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी गोर्ले बोलत होते. वर्षभरात सर्वाधिक एकपात्री प्रयोग सादर करणारे सुबोध चितळे यांना या प्रसंगी 'आर्टिस्ट ऑफ द इयर' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. निळू फुले कला अकादमी येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. एकपात्री कलाकार परिषद, महाराष्ट्रचे अध्यक्ष दीपक रेगे, एकपात्री कलाकार मकरंद टिल्लू व्यासपीठावर होते. नटराज पूजन आणि मधुकर टिल्लू यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

आयुष्यात उद्दिष्ट स्पष्ट असावे लागते, असे सांगून गोर्ले म्हणाले, एकपात्री कलेतून व्यापक दृष्टी मिळते, एकपात्री प्रयोग कशासाठी सादर करतो तर व्यक्त होण्यासाठी आणि या कलेतून आनंद मिळण्यासाठी. एकपात्री हा शब्दांचा किल्ला आहे. शाब्दीक अभिव्यक्ती जगण्यातून येते. त्यामुळे भरभरून जगा. ते पुढे म्हणाले, आयुष्यात यश, पैसा, प्रसिद्धी, आनंद आवश्यक आहे पण समाधान, शांतता कशातून मिळते याचा विचार केला पाहिजे. यश आणि आनंद यांच्यात फारकत करून चालत नाही. दिलखुलास स्वभाव, उमदेपणा आणि खेळकर वृत्ती हे आपल्यात आहे का याचे परिक्षण करा असेही ते म्हणाले.

प्रास्ताविकात मकरंद टिल्लू म्हणाले, मधुकर टिल्लू हे मराठी रंगभूमीवरील एकपात्री कलाप्रकार रुजविणाऱ्या पहिल्या पिढीतील कलाकार होते. अंगविक्षेप आणि अश्लिल कोटीक्रम न करताही विनोद सादर करतो येतो हे त्यांच्या सादरीकरणाचे वैशिष्ट्य होते. सध्याच्या काळात अनेक एकपात्री कलाकार विनोदाची गुंफण करून रसिकांना हसवत आहेत. हेच त्यांनी रंगभूमीला दिलेले सर्वात मोठे योगदान आहे. शिवराज गोर्ले यांचे स्वागत दीपक रेगे आणि मकरंद टिल्लू यांनी केले. सूत्रसंचालन मंजुषा जोशी यांनी केले. एकपात्री कला प्रसार दिनानिमित्त कलाकार दि. १ ते ५ जून या कालावधीत एकपात्री, अभिवाचन, कथाकथन, विनोदी किस्से सादर करणार आहेत. समारोप समारंभ दि. ५ जून रोजी सायंकाळी ५:३० वाजता निळू फुले कला अकादमी येथे आयोजित करण्यात आला असून या प्रसंगी प्रसिद्ध नाटककार श्रीनिवास भणगे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.